दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१३३ | रविवार दि.०२ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### चांगले काम करणाऱ्या न्यायाधीशांवर अन्याय

दिल्ली: 'योग्य आणि उत्तम काम करणाऱ्या न्यायाधीशांवर ही कॉलेजियम (न्यायाधीशांची निवड करणारी न्यायाधीशांचीच समिती) यंत्रणा अन्याय करत आहे. नियुक्ती किंवा पदोन्नती न देण्याचे नेमके कारण स्पष्ट न करून कॉलेजियम न्यायव्यवस्थेची हानी करत आहे, असे परखड मत न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी व्यक्त केले. लाइव्ह लॉने दिलेल्या वृत्तानुसार, एका कार्यक्रमात बोलताना न्यायमूर्ती भुयान म्हणाले, ''कारण न सांगता निर्णय घेतल्यामुळे न्यायाधीशांनी खरोखरच उत्तम कामगिरी केली आहे, त्यांच्यावरच मुख्यत्वे अन्याय होतो, अशा गोपनीयतेमुळे असे लोक न्यायव्यवस्थेत प्रवेश करतात, अयोग्य टिप्पणी करतात. अशा लोकांना रोखण्यासाठी काही प्रमाणात तरी चर्चा व पारदर्शकता असायला हवी. ही पद्धत पूर्णपणे असंवैधानिक आहे. एखाद्याला रोखायचे असेल तर त्याची कारणे स्पष्ट केली पाहिजेत. कारणे जाहीर करण्यात नेमकी काय अडचण आहे?'', असा सवालही त्यांनी केला.

### पारंपरिक विणकरांना १५ हजार उत्सव भत्ता

मुंबई: पाच पारंपरिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील विणकरांना यंदा उत्सव भत्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गणेश चतुर्थीनिमित्त राज्यातील पैठणी साडी, हिमरु शाल, करवत काठी साडी, घोंगडी आणि खण फॅब्रिक आदी पाच पारंपरिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना उत्सव भत्ता देण्यासाठी १ कोटी २५ लाख ९८ हजार इतका निधी वितरीत व खर्च करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या पारंपरिक विणकरांना प्रति पुरुष १० हजार रुपये आणि प्रति महिला १५ हजार याप्रमाणे उत्सव भत्ता मिळणार आहे. राज्याचे एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३–२८ अंतर्गत राज्यातील पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना प्रोत्साहन दिले जात आहे. सदर योजनेंतर्गत नव्याने ई–पहचान कार्ड प्राप्त झालेल्या १,८५० (५७८ महिला व १,२७२ पुरुष) विणकरांसह सन २०२६–२७ या आर्थिक वर्षात १,३५६ महिलांसाठी आणि २,७४५ पुरुषांसाठी अशा एकूण ४,१०१ पात्र लाभार्थ्यांकरिता ४७७.९० लाख निधी उपलब्ध करून देण्याची विनंती वस्त्रोद्योग आयुक्तांनी केली आहे.

### पेपरफुटी दुरुस्ती विधेयकाला राष्ट्रपतींकडून मंजुरी

दिल्ली: प्रश्नपत्रिका फुटीवर अंकुश ठेवण्यासाठी संसदेने मंजूर केलेल्या सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाली आहे. विरोधी पक्षांच्या सभात्यागाच्या पार्श्वभूमीवर संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेला हा कायदा आता देशभरात लागू झाला आहे. आता प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणांचा तपास दोन महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक असेल. या कायद्यानुसार, प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटनांमध्ये किंवा परीक्षेत गैरप्रकार करण्यात सहभागी असलेल्या व्यक्तींना किमान पाच वर्षे आणि जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंतचा कारावास तसेच ५० लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. तसेच संघटित गुन्ह्यांच्या बाबतीत सुधारित कायद्यात किमान सात वर्षांची शिक्षा आणि १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०१ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १००.०० क्विंटल | २,६१५ | २,७८१ | २,६८५ |
| ज्वारी/हायब्रिड :६६.५० क्विंटल | २,२८० | ३,३२० | २,८७० |
| मका/लोकल: २०.०० क्विंटल | २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| तूर : २.०० क्विंटल | ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३२.०० क्विंटल | २,५०१ | ३,०३२ | २,७९५ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,८५१ | ५,५८० | ५,२१५ |

# पीक विम्यासाठी अर्जाची मुदत १० ऑगस्टपर्यंत वाढली

## ६१.८२ लाख शेतकऱ्यांनी केली नोंदणी

मुंबई । प्रतिनिधी

**प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी अर्ज करण्यास उशीर झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. पीक विमा अर्जाची अंतिम मुदत ३१ जुलैऐवजी आता १० ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. आतापर्यंत राज्यातील ६१ लाख ८२ हजार २१८ शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदविला असून, अद्याप अर्ज न भरलेल्या शेतकऱ्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शनिवारी केले.**





काही शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता किंवा अन्य कारणांमुळे अर्ज करता आले नव्हते. या बाबींचा विचार करून राज्य शासनाने अर्ज भरण्याची मुदत १० ऑगस्टपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. विभागनिहाय आकडेवारीनुसार, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर विभागातून सर्वाधिक १३ लाख २५ हजार शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी अर्ज केला आहे. तर कोकण विभागातून केवळ १ लाख २ हजार ३३५ शेतकऱ्यांनी नोंदणी केल्याने या विभागाचा प्रतिसाद सर्वात कमी राहिला आहे. इतर विभागांमध्ये अमरावती विभागातून ६ लाख ९१ हजार ९७३, पुणे विभागातून ६ लाख ७ हजार ६६३, नागपूर विभागातून ४ लाख ५३ हजार ३८३, नाशिक विभागातून ३ लाख ३३ हजार ३८५, लातूर विभागातून २ लाख ४२ हजार ८२६ आणि कोल्हापूर विभागातून ▶▶ पान २ वर

# खासगी वाहनांवर पोलिस लिहिणाऱ्यांवर आता कारवाई

## वाहतूक महासंचालनालयाचे सर्व पोलीस घटकांना आदेश

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील अनेक पोलीस अधिकारी आणि अंमलदार त्यांच्या खासगी चारचाकी व दुचाकी वाहनांवर ''पोलिस'' अशी लाल रंगाची पाटी किंवा लाल अक्षरात ''पोलिस'' लिहून वाहन चालवत असल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकाराबाबत उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून, यावर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांना




कडक निर्देश देण्यात आले आहेत.

सखाराम कुलकर्णी यांनी केलेल्या अर्जाची दखल घेत हे पत्र जारी करण्यात आले आहे. अनेकदा 'पोलिस' पाटी असलेली वाहने तपासली जात नसल्यामुळे, तसेच या गाड्यांचा गैरवापर करून भाडेतत्त्वावर अवैध वस्तूंची ने–आण केली जात असल्याच्या ▶▶ पान २ वर

# अजित डोवाल यांच्यामुळेच देश अंतर्बाह्य सुरक्षित-अमित शहा

पुणे । प्रतिनिधी

देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यामुळेच आज आपला देश अंतर्बाह्य सुरक्षित झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच त्यांची नियुक्ती केली. डोवाल यांनी इंटेलिजन्स ब्युरोच्या माध्यमातून देशासाठी योगदान दिले, असे गौरवोद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काढले.

पुण्यातील टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा



यांच्या हस्ते लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, डॉ. प्रणती टिळक, डॉ. गीताली टिळक आदी उपस्थित होते. अमित शहा म्हणाले की, लोकमान्य टिळक यांनी देशाला स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच हा बीजमंत्र दिला. स्वराज्य म्हणजे आपली भाषा, संस्कृती आणि धर्म होय. त्यांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिकरीत्या ▶▶ पान २ वर

# खोट्या बातम्या पाहून व्यथित झालो, बातमी करण्याआधी वस्तुस्थितीची शहानिशा करा-धनंजय मुंडे

## खोटी बदनामी व सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम करू नका; माध्यमांना आणि माध्यमकर्मींना कळकळीचे आवाहन

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्हा नियोजन समिती बैठक आणि बैठकीनंतरचा जनता संवाद याबाबत मागील दोन दिवसांपासून ठराविक माध्यमांमध्ये दाखवल्या जात असलेल्या खोट्या, चुकीच्या व ३बदनामीकारक बातम्या पसरवून सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम करू नका, असे कळकळीचे आवाहन माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी माध्यमांना आणि माध्यमकर्मींना केले आहे. खोट्या बातम्या पाहून व्यथित झालो, वाईट वाटले पण वस्तुस्थितीची शहानिशा करायला हवी, असे म्हणत याबाबत धनंजय मुंडे यांनी एक्स् पोस्ट करत सविस्तर माहिती दिली आहे.



धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्ट मध्ये जबाबदार माध्यमांना आणि माध्यमकर्मींना कळकळीची विनंती असे म्हणत विशेष आवाहन करत काही तक्रारी बाबतही खुलासा केला आहे. धनंजय मुंडे यांनी म्हटले की, मागील दोन दिवसांपासून विशेष करून समाज माध्यमावर सुरू असलेल्या काही बातम्या पाहून व्यथित झालो, वाईट वाटले. ठराविक माध्यमांना माझे कळकळीचे आवाहन आहे, कृपया कोणतेही वृत्त प्रसारित करताना शहानिशा करण्याची थोडी तसदी घ्या. बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक खेळीमेळीत पार पडली, तिथे माझा आणि विरोधी पक्षातील एका लोकप्रतिनिधींचा कोणताही वाद किंवा खडाजंगी झालेली नाही. राजकारणात वैचारिक मतभेद असतीलही ▶▶ पान २ वर

# तीन मराठी शिक्षकांनीच फोडला निटचा पेपर!

## सीबीआयने आरोपपत्रात ठेवला ठपका

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

नीट–यूजी २०२६ची प्रश्नपत्रिका तयार करण्याची जबाबदारी असलेल्या तीन मराठी शिक्षकांनीच त्यांना मिळालेल्या सवलतींचा गैरफायदा घेत या पेपरफुटीमध्ये मोठी कामगिरी बजावल्याचा ठपका प्रकरणाचा तपास करणाऱ्या केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सीबीआय) विभागाने आरोपपत्रात ठेवला आहे. सीबीआयने आरोपपत्रात राष्ट्रीय परीक्षा संस्थेतील (एनटीए) त्रुटींवरही बोट ठेवले असून, अशा घटना रोखण्यासाठी




सविस्तर अहवाल लवकरच एनटीएला देणार आहे.

सीबीआयने दावा केला की, पेपर लीक होण्याचे मुख्य कारण एनटीएच्या परीक्षा प्रक्रियेतील गंभीर त्रुटी होती. वैद्यकीय प्रवेश परीक्षेची (नीट) प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या शिक्षकांनाच तिचे मराठी भाषांतराचे काम सोपवले गेले. यामुळे आरोपींना अंतिम प्रश्नपत्रिका लक्षात ठेवण्याची संधी मिळाली. सीबीआयने अटक केलेले तिन्ही शिक्षक एनटीएच्या पेपर सेटिंग पॅनलचा भाग होते. या प्रकरणात अटक असलेल्या पी. व्ही. कुलकर्णी (रसायनशास्त्र), ▶▶ पान २ वर

# मोदींनी देशालाच परिवार मानले !

## पंकजा मुंडे यांनी पोस्ट करीत केले मोदींच्या कार्यशैलीचे कौतुक

मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ऊर्जा ही तरुणांनाही लाजवणारी आहे. उपवास असतानाही फक्त गरम पाणी पिऊन ते प्रचंड ऊर्जेने काम करतात. ज्यांना स्वतःचा परिवार नाही म्हणून हिणवले गेले, त्यांनी या देशालाच आपला परिवार मानले आहे, अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यशैलीचे




कौतुक केले आहे. दिल्लीत आयोजित भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीदरम्यानचा आपला थेट अनुभव सांगणारा एक ▶▶ पान २ वर

# अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक वंचितांच्या संघर्षाचे प्रेरणास्थान- मुख्यमंत्री

## चिराग नगर येथे भव्य स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे जयंतीदिनी भूमिपूजन

पुणे । प्रतिनिधी

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, विचार आणि सामाजिक कार्य हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण जगाला प्रेरणा देणारे आहे. चिरागनगर या त्यांच्या कर्मभूमीत उभारण्यात येणारे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि स्मारक हे केवळ एक वास्तू नसून वंचित, कष्टकरी




आणि उपेक्षित समाजाच्या संघर्षाचे, स्वाभिमानाचे; तसेच सामाजिक परिवर्तनाचे जिवंत प्रतीक ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

चिरागनगर (घाटकोपर) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए), बृहन्मुंबई यांच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या 'लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था' आणि स्मारकाच्या पहिल्या टप्प्याच्या भूमिपूजन समारंभात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदचे उपसभापती सचिन अहिर, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास ▶▶ पान २ वर

# भाजपने जे पेरलं तेच उगवलं ; राज ठाकरेंची टीका!



मुंबई । प्रतिनिधी

१२ वषापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या ट्रोल टीमने विरोधकांवर बोचरी टीका सुरू केली. त्यांनी १२ वर्षापूर्वी जे पेरलं होतं ते आता उगवल आहे. आता हेच ट्रोलिंग भाजपवर होत आहे. पंतप्रधानांवर झालेली टीका ही चुकीची आहे. पण विरोधकांवर होणारे टइीका ट्रोलिंगही बंद व्हाव्यात. तुम्हीही मर्यादा पाळल्या पाहिजेत असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केल. मनसेच्या विद्यार्थी संघटनेचा ▶▶ पान २ वर

# राष्ट्रीयत्व सिद्ध झाल्याशिवाय परदेशी नागरिकाला हद्दपार करता येणार नाही

## सर्वोच्च न्यायालयात केंद्राची भूमिका

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

एखाद्या परदेशी नागरिकाचे राष्ट्रीयत्व स्पष्ट किंवा पडताळलेले नसेल, तर संबंधित देशाने त्याचे नागरिकत्व मान्य करून त्याला स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याशिवाय त्या व्यक्तीला त्याच्या देशात परत पाठवता येत नाही, अशी महत्त्वाची भूमिका केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात मांडली आहे.

आसाममध्ये परदेशी नागरिक म्हणून घोषित करण्यात आलेल्या व्यक्तींना अनिश्चित काळासाठी ताब्यात ठेवण्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणीदरम्यान गृह मंत्रालयाने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. त्यामध्ये परदेशी नागरिकांना डिपोर्ट करण्याची प्रक्रिया आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या कायदेशीर अटी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, ज्या व्यक्तीचे राष्ट्रीयत्व अज्ञात किंवा वादग्रस्त आहे, तिची नागरिकत्व पडताळणी पूर्ण होईपर्यंत किंवा संबंधित देशाकडून वैध प्रवास दस्तऐवज व अधिकृत स्वीकृती मिळेपर्यंत त्या व्यक्तीला भारतातून हद्दपार करता येत नाही. अशा परिस्थितीत केवळ परदेशी असल्याचा संशय किंवा घोषणा पुरेशी नसून, संबंधित देशाने त्या व्यक्तीला आपला नागरिक म्हणून स्वीकारणे आवश्यक असते. प्रतिज्ञापत्रानुसार, कोणत्याही परदेशी नागरिकाला




त्याच्या देशात पाठविण्यापूर्वी संबंधित देशाच्या दूतावासामार्फत त्याच्या राष्ट्रीयत्वाची कायदेशीर पडताळणी केली जाते. त्यानंतरच प्रवासासाठी आवश्यक कागदपत्रे जारी केली जातात. ही प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय डिपोर्टची कारवाई सुरू करता येत नाही.ङ्गकेंद्राने न्यायालयाला सांगितले की, राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन किंवा फॉरेनर्स रिजनल ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# पंच कोणाचा? सरकारचा की संविधानाचा?

भारताची लोकशाही आज एका मूलभूत प्रश्नासमोर उभी आहेनिवडणूक आयोग हा सरकारचा विस्तार आहे की संविधानाने निर्माण केलेली स्वतंत्र संस्था? हा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केलेला नाही; तो थेट सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला आहे. त्यामुळे या प्रश्नाचे गांभीर्य अधिक वाढते.

क्रिकेटमध्ये पंच निष्पक्ष नसल्याचा संशय आला, तर सामन्याचा निकाल कितीही योग्य असला तरी तो स्वीकारला जात नाही. लोकशाहीत निवडणूक आयोग हा त्या पंचाच्या भूमिकेत असतो. त्यामुळे आयोग फक्त निष्पक्ष असणे पुरेसे नाही; तो कोणाच्याही प्रभावाखाली नाही, असा निर्विवाद विश्वास नागरिकांच्या मनात असणे अधिक महत्त्वाचे आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी केंद्र सरकारने २०२३ मध्ये केलेल्या कायद्यामुळे आज हा विश्वासच कसोटीवर लागला आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी नियुक्ती प्रक्रियेत पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांचा समतोल राखणारी समिती सुचवली होती. मात्र संसदेने मंजूर केलेल्या नव्या कायद्यात सरन्यायाधीशांना वगळून केंद्रीय मंत्र्याचा समावेश करण्यात आला. परिणामी समितीत सरकारचे दोन प्रतिनिधी आणि विरोधकांचा एक प्रतिनिधी अशी रचना झाली. मग प्रश्न उभा राहतो, नियुक्ती करणाऱ्या समितीत सरकारचे बहुमत असेल, तर आयोगाच्या स्वायत्ततेबद्दल नागरिकांच्या मनात शंका निर्माण होणार नाही का? सर्वोच्च न्यायालयानेही सुनावणीदरम्यान हाच प्रश्न उपस्थित केला आहे. सरकारचा युक्तिवादही महत्त्वाचा आहे. संसदेला कायदा करण्याचा घटनात्मक अधिकार आहे आणि नियुक्ती प्रक्रिया कशी असावी, हा धोरणात्मक निर्णय असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. परंतु लोकशाहीत केवळ अधिकार पुरेसा नसतो; त्या अधिकाराचा वापर जनतेच्या विश्वासाला धक्का न लावणारा असावा लागतो. आजचा वाद केवळ एका कायद्याचा नाही. तो भारतातील प्रत्येक मतदाराच्या विश्वासाचा आहे. मतदान करताना नागरिकाला एवढीच अपेक्षा असते की, त्याचे मत कोणत्याही राजकीय दबावाशिवाय मोजले जाईल आणि निवडणूक आयोग सर्व पक्षांशी समान वागणूक ठेवेल. आयोगाच्या नियुक्ती प्रक्रियेवरच संशय निर्माण झाला, तर भविष्यात निवडणुकीच्या निकालांवरही अनावश्यक प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. घटनात्मक संस्थांची ताकद त्यांच्या अधिकारात नसते; ती त्यांच्या विश्वासार्हतेत असते. न्यायालय, निवडणूक आयोग, नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा इतर स्वायत्त संस्था या कोणत्याही सरकारच्या नव्हे, तर संविधानाच्या असतात. सरकारे बदलतात, बहुमत बदलते, राजकीय समीकरणे बदलतात; पण संविधान आणि त्याच्या संस्थांवरील जनतेचा विश्वास अबाधित राहिला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय काहीही असो, त्यातून एक गोष्ट स्पष्ट व्हायला हवी. निवडणूक आयोगाची नियुक्ती अशी असली पाहिजे की कोणत्याही सरकारला, कोणत्याही पक्षाला किंवा कोणत्याही नागरिकाला त्याच्या निष्पक्षतेबद्दल संशय वाटू नये. कारण लोकशाही केवळ मतदानावर टिकत नाही; ती विश्वासावर टिकते. आणि तो विश्वास ढासळला, तर निवडणुका राहतील, सरकारेही येतील-जातील; पण लोकशाहीचा आत्माच कमकुवत होईल. लोकशाहीत पंच हा सरकारचा नसतो, विरोधकांचाही नसतो तो फक्त संविधानाचा असतो.

# डॉ.अण्णाभाऊ साठेंचा आदर्श युवकांनी घ्यावा-बदामराव पंडित
## शिस्त,विवेक आणि दिशा हे समाजासाठी गरजेचे- बाळराजे पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी समाजाच्या जागृतीसाठी खूप मोठे योगदान दिले आहे त्यांच्या कार्याची दखल घेऊन रशियामध्ये त्यांचा पहिला पुतळा उभा करण्यात आला प्रतिकूल परिस्थितीमध्ये अण्णाभाऊ साठे यांनी काम करून समाजाला नवी दिशा दिली आहे त्यांचा आदर्श आजच्या तरुणांनी घेऊन काम करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे. युवकांनी सतत राजकारण आणि पक्ष फक्त निवडणुकीपुरताच ठेवावा सर्वांनी एकत्र येऊन शिस्त, विवेक आणि दिशा हे समाजासाठी गरजेचे असल्याने त्यासाठी काम करावे असे भाजप नेते बाळराजे पवार यांनी म्हटले आहे.**




लोकशाहीत साहित्यरत्न डॉक्टर अण्णा भाऊ साठे यांची १२६ जयंती गेवराई शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजप नेते बाळराजे पवार, सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष रोहित पंडित, उपनगराध्यक्ष ॲड भगवानराव घुंबार्डे, नगरसेवक ऍड राजेंद्र राक्षसभुवनकर, शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके, नगरसेवक शेख खाजा, सरपंच कैलास माने, माजी उपनगराध्यक्ष सुशील जवंजाळ, सुघोष मुंडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित सर्वांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की अण्णाभाऊ साठे यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये संपूर्ण समाजाला सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी काम केले. शाहिरी, पोवाडा, लावणी आदींचे लिखाण करून समाज उपयोगी साहित्य निर्माण केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन सर्वात प्रथम रशियामध्ये त्यांचा पुतळा उभा करण्यात आला त्यानंतर भारतामध्ये सुद्धा अनेक ठिकाणी त्यांचे पुतळे उभा करण्यात आले. त्यांनी सुरू केलेली चळवळ ही पुढे लोक चळवळ झाली आणि याच चळवळीचा आदर्श आजच्या युवा पिढीने घेणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी बोलताना बाळराजे पवार म्हणाले की, राष्ट्रपुरुषांच्या जयंती उत्सवामधुन समाजाला आणि युवकांना नवी दिशा मिळणे गरजेचे आहे. आजही वंचित हा वंचितच राहत आहे. युवकांनी एकत्र येऊन चळवळ उभा केली तर त्यांचे राजकारण बिघडते. त्यामुळे राजकारणी युवकांची चळवळ मोठी होऊ देत नाहीत. असे स्पष्ट सांगून गेवराई शहरात समाजासाठी सुसज्ज अभ्यासिका उभा करण्यासाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सुतार यांनी केले. कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष ब्रह्मदेव धुरंधरे, गजानन काळे, नगरसेवक सुभाष सुतार, माजी नगरसेवक राधेश्याम येवले, जालिंदर पिसाळ, भारत गायकवाड, अशोक गायकवाड, उज्वल सुतार, अमोल सुतार, भाऊसाहेब माखले, रंजीत सुतार, सुनील पोपळे, विशाल थोरात, साईनाथ सुतार, विलास सुतार, रजनी सुतार आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिप्रेशन किंवा नैराश्य ही केवळ तात्पुरती उदासी नसुन ती एक गंभीर मानसिक स्थिती आहे- डॉ.जगदिश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

डिप्रेशन किंवा नैराश्य ही केवळ तात्पुरती उदासी नसून ती एक गंभीर मानसिक स्थिती आहे. यामध्ये व्यक्तीला सतत दुःख जाणवणे, कामात रस कमी होणे आणि दैनंदिन आयुष्य जगताना निरुत्साह वाटणे अशी लक्षणे दिसतात. डिप्रेशनची काही मुख्य लक्षणे म्हणजे झोप न येणे किंवा अति झोप येणे, भूक मंदावणे, एकाग्रता कमी होणे आणि स्वतःला दोष देत राहणे.



डिप्रेशनवर काही नैसर्गिक आणि प्रभावी उपाय औषधोपचारांसोबतच जीवनशैलीत काही बदल केल्यास मनाची स्थिती सुधारण्यास मोठी मदत होते: १. सूर्यप्रकाश आणि व्हिटॅमिन डी:* सकाळच्या कोवळ्या उन्हात किमान १०-१५ मिनिटे बसा. सूर्यप्रकाशामुळे शरीरात 'सेरोटोनिन' या हार्मोन्सची निर्मिती वाढते, ज्यामुळे मूड सुधारण्यास मदत होते. २. पौष्टिक आणि संतुलित आहार: तुमच्या आहारात ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स (अक्रोड, अळशी), हिरव्या पालेभाज्या आणि फळांचा समावेश करा. जंक फूड आणि जास्त साखर असलेले पदार्थ टाळा, कारण ते शरीरातील ऊर्जेची पातळी कमी करतात. ३. नियमित दिनचर्या : नैराश्यामध्ये दिवसाचे नियोजन विस्कळीत होते. झोपण्याची, उठण्याची आणि जेवणाची एक ठराविक वेळ निश्चित करा. छोटे-छोटे ध्येय ठरवा आणि ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. ४. योग आणि ध्यान योगासने आणि ध्यान केल्याने मानसिक शांतता मिळते. भ्रामरी प्राणायाम किंवा अनुलोम-विलोम सारखे श्वसनाचे प्रकार मज्जासंस्थेला शांत करतात आणि नकारात्मक विचार कमी करण्यास मदत करतात. ५. सोशल कनेक्टिव्हिटी:*एकटे राहणे टाळा. आपल्या जवळच्या मित्रांशी किंवा कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधा. तुमचे विचार शेअर केल्याने मनावरचा ताण हलका होतो. ६. पुरेशी झोप: मानसिक आरोग्यासाठी रात्रीची ७ ते ८ तासांची सलग झोप अत्यंत आवश्यक आहे. झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा स्क्रीनचा वापर कमी करा. . छंद जोपासा: तुम्हाला जे आवडतेमग ते गाणे असो, बागेत काम करणे असो किंवा वाचनत्यासाठी वेळ काढा. सृजनात्मक कामांमुळे मेंदूला उभारी मिळते. महत्त्वाची सूचना: नैसर्गिक उपाय हे प्राथमिक अवस्थेत किंवा पूरक म्हणून काम करतात. जर नैराश्याची भावना तीव्र असेल, आत्महत्येचे विचार येत असतील किंवा दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ लक्षणे टिकून असतील, तर मानसशास्त्रज्ञ किंवा मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यंत अनिवार्य आहे असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# नवनाथ शिराळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त केले अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

आज जगभरामध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या वातावरणामध्ये साजरी व संपन्न झाली याच पार्श्वभूमीवर बीड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो या जयघोषाने अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले या वेळी येथे उपस्थित असलेले लेक लाडकी अभियान चे बाजीराव ढाकणे रयत सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक आर जी माने सामाजिक कार्यकर्त्या तथा लोकशाही पत्रकार संघाच्या मीराताई डावक३र मॅडम एडवोकेट वंदना पारवे मॅडम



तसेच त्यांच्या सहकारी माता भगिनी सह उपस्थित किशोर देवा कुलकर्णी संजय देवा कुलकर्णी यांच्या सह बीड शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते अण्णाभाऊ साठे यांचे कार्य अतिशय उत्कृष्ट आणि उल्लेखनीय आहे त्यांच्या विचाराने सध्या तरुणाईला चालण्याच्या आवश्यकता आहे अण्णाभाऊ साठे यांचे विचार सर्वांनी आत्मसात करावेत व त्यांच्या उत्कृष्ट विचाराने पुढे चालावे जेणेकरून कुठेच भविष्यामध्ये अडचण निर्माण होणार नाही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याच्या बाबतीत कितीही बोलले तरी शब्द कमी पडतात म्हणून त्यांना त्यांच्या या जयंतीनिमित्त मनस्वी सर्वांच्या वतीने अभिवादन करतो व त्यांचे विचार सर्वांनी तरुणांनी घेऊन पुढे चालावे कोणीही व्यसनी बनू नये निर्व्यसनी व्हावे कुठल्याही प्रकारचे व्यसन तरुणाईने करू नये आरोग्य चांगल्या प्रकारे आपले सुधारावे आणि राष्ट्रसेवा सर्वांनी करावी असे अनमोल विचार भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी अभिवादन केल्यानंतर उपस्थित असलेल्या मान्यवरांसमोर थोडक्यात आपले अभ्यासपूर्वक मनोगत व्यक्त केले व हा कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये बीड शहरांमध्ये संपन्न झाला.

# शिवाजीनगर पोलीस ठाण्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न; ५३ जणांचे रक्तदान

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक सलोखा, पोलीस-जनता मैत्री आणि समाजोपयोगी उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून सार्वजनिक जयंती व उत्सव समाजहिताच्या कार्यातून साजरे करण्याचा उपक्रम बीड जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिरास नागरिक, युवक तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवसभरात एकूण ५३ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. विशेष म्हणजे, जिल्ह्यात विविध ठिकाणी बंदोबस्ताची महत्त्वाची जबाबदारी




पार पाडत असतानाही अनेक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळ काढून रक्तदान केले आणि समाजापुढे एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. पोलीस व सामान्य नागरिक यांच्यातील विश्वास, जवळीक आणि समन्वय अधिक दृढ करणे, युवकांना समाजोपयोगी कार्यासाठी प्रेरित करणे तसेच बीड जिल्ह्यात वेळोवेळी जाणवणाऱ्या रक्ताच्या तुटवड्यावर मात करण्यासाठी नागरिकांमध्ये रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरती मर्यादित न राहता समाजाला दिशा देणाऱ्या विधायक उपक्रमांद्वारे साजरी व्हावी, असा संदेश या शिबिरातून देण्यात आला. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते, त्यामुळे प्रत्येक सक्षम नागरिकाने नियमित रक्तदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सदर रक्तदान शिबिर मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या प्रेरणेने, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक श्री. शीतलकुमार बल्लाळ आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील अधिकारी, अंमलदार, स्वयंसेवक व रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांच्या विशेष परिश्रमाने यशस्वी झाले.

# पान १ वरून...

## पीक विम्यासाठी अर्जाची मुदत

२ लाख ४० हजार २५३ शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग नोंदविला आहे. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पीक कर्जदार शेतकऱ्यांनी संबंधित बँकेशी संपर्क साधून, तर बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी अधिकृत संकेतस्थळ किंवा जवळच्या सेवा केंद्रामार्फत १० ऑगस्टपूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी. यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, प्रधानमंत्री पीक विमा योजना ही अतिवृष्टी, दुष्काळ, पूर, गारपीट तसेच हवामानातील बदलांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणारी महत्त्वाची योजना आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र शेतकऱ्याने या योजनेत सहभागी होणे आवश्यक आहे. राज्यातील एकही पात्र शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका असून, ज्या शेतकऱ्यांनी अद्याप अर्ज केलेला नाही त्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेऊन १० ऑगस्टपूर्वी अर्ज करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

----------------

## अजित डोवाल यांच्यामुळेच देश

साजरे करण्याची प्रथा सुरू करून देशातील जनतेला जोडण्याचे काम करीत सांस्कृतिक राष्ट्रवादची मुहूर्तमेढ रोवली. आज देश याच राष्ट्रवादावर चालत असून, त्याला कोणी मागे खेचू शकत नाही. पत्रकार किती निर्भीड असू शकतो, याचे ते मूर्तिमंत उदाहरण होते. इंग्रज केवळ केसरी आणि मराठा या वृत्तपत्राला घाबरत होते. कोट्यवधी लोकांच्या मनात स्वराज्याची ज्योत त्यांनी पेटवली. संघटनेशिवाय राष्ट्रशक्ती उभारू शकत नाही, हे त्यांनी सांगितले. त्यांचा गीतारहस्य हा ग्रंथ सर्व युवकांनी वाचावा. ते चुकीच्या रस्त्याने कधी जाणार नाहीत. कोणताही पुरस्कार हा लोकांना प्रेरणा देणारा, त्या व्यक्तीचा कामाचा सन्मान करणारा असतो. डोवाल यांच्यासारख्या लोकांनी देशाला जीवन समर्पित केले. त्यांच्यासारख्या व्यक्तींना हा पुरस्कार देणे हा देशातील लोकांसाठी प्रेरणादायी आहे. मी गुजरातमध्ये गृहमंत्री असताना एकदा बॉम्बस्फोट झाल्यावर तत्कालिन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी मला या बॉम्बस्फोटाच्या घटनेचा तपास करण्यासाठी डोवाल यांना बोलावण्यास सांगितले. त्यानंतर गुजरातमधील १३ साखळी बॉम्बस्फोट उघडकीस आले होते, असे म्हणत शहा यांनी पंतप्रधान मोदी आणि डोवाल यांच्यावर स्तुतिसुमने उधळली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अजित डोवाल हे देशाच्या सुरक्षेचे चाणक्य आहेत, तर गृहमंत्री अमित शहा हे राजकीय चाणक्य आहेत. त्यामुळे एका चाणक्याने दुसऱ्या चाणक्याचा यथोचित सन्मान केला आहे. भारत हा आता मार खाणारा देश राहिला नसून, शत्रूच्या घरात शिरून मारणारा देश झाला आहे. परखडपणे मत मांडणारे व्यक्तिमत्त्व डोवालच असून, त्यांनी कधी कोणत्या पुरस्काराची अपेक्षा केली नाही.

------------

## खासगी वाहनांवर पोलि

तक्रारी आहेत. त्यामुळे अशा खासगी वाहनांवर लाल अक्षरात ''पोलिस'' लिहिलेल्या व ''पोलिस'' पाटी लावलेल्या वाहन चालकांवर त्वरित प्रतिबंध घालण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली होती. राज्यातील सर्व पोलीस अधीक्षकांनी आणि आयुक्तांनी आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रात तपासणी करून, जर कोणतीही खासगी वाहने ''पोलिस'' पाटी किंवा ''पोलिस'' नाव असलेली आढळल्यास त्यांच्याविरुद्ध कलम १३३ (६) महाराष्ट्र मोटर वाहन नियम १९८९ सह कलम १७७ मोटर वाहन कायदा १९८५ अन्वये कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशामुळे खासगी गाड्यांचा बोगस वापर करून धाकदपटशहा करणाऱ्यांवर मोठा चाप बसणार आहे.

----------

## तीन मराठी शिक्षकांनीच

मनीषा गुरुनाथ मांडरे (भौतिकशास्त्र) आणि मनीषा संजय हवालदार (जीवशास्त्र) या तिघांनी अंतिम प्रश्नपत्रिकेतील प्रश्न लक्षात ठेवून ते पुण्यातील आपल्या कोचिंग क्लासमधील निवडक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले. या तिघांना प्रश्नपत्रिका अंतिम करण्यासाठी अनेक दिवस मिळाले. कारण, त्यांच्याकडे तिच्या मराठी भाषांतराची जबाबदारीही होती. याचदरम्यान त्यांनी प्रश्न लक्षात ठेवून त्यांचा संच तयार केला, असा आरोप सीबीआयने ठेवला आहे. प्रश्नपत्रिका गोपनीय ३राहण्यासाठी या तिघांना सुरक्षित वातावरणात ठेवले गेले. परंतु, त्यांना घरी जाण्याची व कोचिंग क्लासमध्ये शिकवण्याची परवानगी होती. या काळात त्यांनी विद्यार्थ्यांना अंतिम नीट परीक्षेत येणारे प्रश्न महत्त्वाचे म्हणून शिकवले. या सागळ्यात पुण्यातील ब्यूटीशियन मनीषा वाघमारे हिची महत्त्वाची भूमिका होती. तिघांशीही ओळख असलेल्या वाघमारेने क्लासच्या विद्यार्थ्यांकडून हे प्रश्न मिळवले. टाइप करून त्यांची पीडीएफ तयार केली. ही पीडीएफ धनंजय लोखंडे याच्यापर्यंत पोहोचली. लोखंडेने लीक पेपर पुढे अनेकांना विकला. याच नेटवर्कद्वारे ही प्रश्नपत्रिका विविध राज्यांपर्यंत पोहोचली, असा ठपकाही सीबीआयने ठेवला आहे.

----------

## खोट्या बातम्या पाहून व्यथित झालो,

मात्र सौहार्द आणि संवाद असतोच, त्याला कुणीच अपवाद नाही. बैठकीतील प्रत्यक्षदर्शींकडून याची खात्री करता आली असती, मात्र अशा प्रकारच्या बातम्या चालवून काहींना जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडवून टाकायचा आहे.! दुसरा विषय, आदरणीय सुनेत्रा वहिनी या महिला आहेत, आधीच कौटुंबिक दुःखात आणि त्यात स्व.अजितदादांच्या माघारी प्रथमच बीड शहरात आल्या होत्या. अत्यंत गर्दीच्या ठिकाणी काही नागरिक मोठमोठ्याने बोलत असल्याने सर्वांचे म्हणणे नेमके कळणार नाही या दृष्टीने मी आपले प्रश्न शांतपणे मांडा, हळू बोला अशी विनंती केली असता त्याचेही रुपांतर धनंजय मुंडे याने शेतकऱ्यांना दम दिला असे केले जात आहे, याचे सध्याच्या काळात ३मला आश्चर्य वाटत नाही, कारण ठराविक माध्यम प्रतिनिधींनी तसा अजेंडा राबवण्याचा घाट घातलेला आहे. बीड जिल्ह्यातील ९०% पेक्षा अधिक पत्रकार हे अत्यंत जबाबदारीपूर्वक काम करतात. त्यांच्या निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारितेचा मी कायम आदर करतो. मात्र काही पत्रकारांच्या बाबतीत आर्थिक गैरव्यवहार सहित अनेक तक्रारी माझ्याकडे पूर्वीच आलेल्या आहेत. परंतु कुणाचे तारुण्यात नुकसान नको, म्हणून मी वरिष्ठांना तक्रार करण्याऐवजी दुर्लक्ष केले. कुणाच्याही आर्थिक लाभ किंवा समृद्धीच्या आड मी येऊ इच्छित नाही. जिल्ह्यात बिघडलेला सामाजिक सौहार्द हळूहळू स्थिर होत आहे, कृपया चुकीच्या बातम्या पेरून वातावरण बिघडवू नका, ही कळकळीची विनंती, असे नम्र आवाहन श्री मुंडे यांनी आपल्या पोस्टद्वारे केले आहे.

---------------

## अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक वंचितांच्या

आठवले, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मुंबईच्या महापौर रितू तावडे, खासदार संजय दिना पाटील, आमदार सर्वश्री राम कदम, अमित गोरखे, प्रसाद लाड, अमित साटम, अण्णा भाऊ साठे यांच्या स्नुषा श्रीमती सावित्रीबाई साठे, नात ज्योती साठे, नातू सचिन साठे आदींसह विविध लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या या महत्त्वाकांक्षी स्मारकाचा निर्णय २०१६ मध्ये घेण्यात आला होता. शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून हा प्रकल्प खासगी विकासकांकडून उभारण्यापेक्षा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून उभारण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे स्मारकाचे काम अधिक पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने पूर्ण होणार आहे. स्मारक उभारताना परिसरातील नागरिकांच्या पुनर्वसनाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकासाठी कोणांलाही बेघर करून विकास करणे हा शासनाचा मार्ग नाही. पात्र असो किंवा अपात्र, प्रत्येक नागरिकाला योग्य घर देऊनच हे स्मारक उभारण्यात येत आहे. सामाजिक न्यायाची हीच खरी अंमलबजावणी आहे. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा गौरव करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, त्यांच्या साहित्याचा जगातील २७ हून अधिक भाषांमध्ये अनुवाद झाला असून रशियन, फ्रेंच, इटालियनसारख्या आंतरराष्ट्रीय भाषांमधून त्यांचे विचार जगभर पोहोचले आहेत. २०२२ मध्ये रशियातील मॉस्को विद्यापीठात त्यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले आणि तेथील साहित्यिकांनी त्यांच्या साहित्यावर चर्चा केली, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. स्मारकाचे काम वेळेत पूर्ण करण्याबाबत एसआरए आणि संबंधित यंत्रणांना निर्देश देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पाला अनावश्यक विलंब होऊ देणार नाही. जुलै २०२९ पर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवून सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. या भव्य स्मारकाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्याचा मानस आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक हे सामाजिक समता, स्वाभिमान, संघर्ष आणि परिवर्तनाचा संदेश देणारे प्रेरणास्थान ठरेल. मातंग समाजासह सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यावेळी 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी)' ही मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची संस्था ठरेल, असा विश्वास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले व्यक्त केला.

------------

## मोदींनी देशालाच परिवार मानले !

विशेष व्हिडीओ पंकजा मुंडे यांनी सोशल मीडियावर पोस्ट केला असून, तो सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. पंकजा मुंडे यांनी व्हिडीओत दिलेल्या माहितीनुसार, त्या भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीसाठी दोन ते तीन दिवस दिल्लीत होत्या. बैठकीच्या शेवटच्या दिवशी पंतप्रधान मोदी अमेरिकेचा अधिकृत दौरा पूर्ण करून कोणतीही विश्रांती न घेता थेट बैठकीला पोहोचले. प्रवासाचा थकवा न जाणवू देता त्यांनी प्रत्येक मतदारसंघाचा, स्थानिक प्रश्नांचा आणि विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. ही बैठक तब्बल साडेआठ तास चालली आणि त्यात केवळ चहा-कॉफीसाठी अल्प विश्रांती घेण्यात आली होती. बैठकीच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उपवास होता. केवळ गरम पाणी पिऊन त्यांनी सलग साडेआठ तास प्रत्येक विषयावर सक्रिय सहभाग नोंदवला. उपवास असूनही त्यांच्या कामातील ऊर्जा, एकाग्रता आणि उत्साह किंचितही कमी झाला नव्हता. स्वतःला शिव्या देणाऱ्यांनाही माफ करण्याचा मोठेपणा त्यांच्याकडे आहे आणि तोच त्यांना श्रेष्ठ बनवतो,'' असे पंकजा मुंडे यांनी आवर्जून सांगितले. पंतप्रधान मोदींनी तरुणांना फ्रेंड संबोधल्याचा उल्लेख करत पंकजा मुंडे म्हणाल्या, ''ज्या दिवशी त्यांनी तरुणांना फ्रेंड म्हटले, त्या दिवशी प्रत्येकाच्या मनातील नकारात्मक भाव नाहीसा झाला. तुम्ही या देशाच्या विकासाचे आणि भवितव्याचे फ्रेंड आहात.'' या अनुभवामुळे सार्वजनिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक स्पष्ट झाला असून, देशाच्या विकासासाठी प्रत्येकाने आपला खारीचा वाटा उचलावा, असे आवाहनही त्यांनी केले.

-----------

## राष्ट्रीयत्व सिद्ध झाल्याशिवाय परदेशी

रजिस्ट्रेशन ऑफिस (एफआरआरओ) यांच्या माध्यमातून अशा परदेशी नागरिकांना शिक्षा पूर्ण झाल्यानंतर किंवा न्यायालयीन प्रक्रिया संपल्यानंतर त्यांच्या देशात परत पाठवले जाते. मात्र, त्यासाठी संबंधित व्यक्तीकडे वैध पासपोर्ट असणे, आवश्यक प्रवास कागदपत्रे उपलब्ध असणे आणि त्याच्याविरुद्ध भारतात अन्य कोणताही गुन्हेगारी खटला प्रलंबित नसणे आवश्यक आहे. या प्रतिज्ञापत्रामुळे राष्ट्रीयत्वाची पडताळणी, संबंधित देशाची संमती आणि प्रवास कागदपत्रांची उपलब्धता या बाबी परदेशी नागरिकांच्या डिपोर्ट प्रक्रियेत किती महत्त्वाच्या आहेत, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी होणार असून, न्यायालयाच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

-------------

## भाजपने जे पेरलं तेच उगवलं

२० वा वर्धापनदिन सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते. जंतर-मंतरवर जे विद्यार्थी आंदोलनाला बसले होते. त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला होता. त्यांना आदेश देणारे जे लोक होते ते कधी माफी मागणार असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. नीट पेपर फुटी हे कारण होतं, मात्र यात फक्त विद्यार्थीच नव्हते तर तरूणही होते आणि सभोवतालच्या नैराश्याच्या वातावरणातून हे सर्व झाल्याची टीका त्यांनी केली. मोदी म्हणाले ज्यांनी ट्रोल केले मी त्या सगळ्यांना माफ करतो. नीटचे पेपर फुटल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी जीवन संपवले त्यांच्या आई-वडीलांची कोण माफी मागणार म्हणत त्यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. जिथे आपण श्रद्धेने जातो. त्या मंदिरात आपण दान करतो. त्या मंदिरात लाखो, कोट्यवधी रूपये जमा होतात. त्याचे काय होते ते काही कळत नाही म्हणत त्यांनी अयोध्येतील राम मंदिराच्या देणगी चोरीच्या प्रकरणाचाही आपल्या खास शैलीत समाचार घेतला. आताच्या देशातील सर्व नकारात्मक व्यवस्थेला कंटाळलेला तरूण आशेने, श्रद्धेने मंदिराचा रस्ता पकडतो. त्याला धर्मांध बनवू नका. फक्त रामाचे नाव घेउन काही होणार नाही तर तरूणांसाठी दर्जेदार शिक्षण आणि पारदर्शक् व्यवस्था, नोकरी यांची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---------------

# हज यात्रेकरूंनी १० ऑगस्ट २०२७ पर्यंत रक्कम जमा करावी

**बीड । प्रतिनिधी**

**हज यात्रा २०२७ साठी बीड जिल्ह्यातून हज यात्रेसाठी निवड झालेल्या (हज नंबर लागलेल्या) यात्रेकरूंना महत्त्वाचे आवाहन करण्यात आले आहे. हज यात्रेची पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी यात्रेकरूंनी आवश्यक ती कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन खादिमुल हुज्जाज, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.**

हज यात्रेसाठी निवड झालेल्या सर्व यात्रेकरूंनी हजची निर्धारित रक्कम दि. १० ऑगस्ट २०२७ पर्यंत जमा करावी, असे कळविण्यात आले आहे. तसेच हज यात्रेशी संबंधित कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, प्रवासाची तयारी व इतर आवश्यक माहितीसाठी यात्रेकरूंनी बीड येथील मिना फंक्शन हॉल येथे संपर्क साधावा. यात्रेकरूंच्या सोयीसाठी मिना फंक्शन हॉल येथे सकाळी १०.३० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे. हज यात्रेची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व कागदपत्रांची पूर्तता वेळेत करणे गरजेचे असल्याचेही सांगण्यात आले आहे. हज यात्रेकरूंनी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, रक्कम भरण्याची प्रक्रिया, तसेच इतर बाबींची सविस्तर माहिती घेण्यासाठी खालील खादिमुल हुज्जाज, बीड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. फरीद सर ९०९६१८००४१, इरफान सर ७०२०५९२३२८, निझाम भाई ९४२२६५०९४९, हज यात्रेकरूंनी वेळेत संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन खादिमुल हुज्जाज, बीड (मिना फंक्शन हॉल) यांच्या वतीने करण्यात आले आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. ०२ ऑगस्ट २०२६
३

## थोडक्यात



**माजलगाव:- लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि,सुंदरनगर कार्यलयात साहित्यिक, लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करणेत आली. प्रसंगी प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, अशोकराव पाटील,शकर आबुज,भारतराव शेळके,बालाजी सुरवसे,राम मायकर,अर्जुन मोरे,बळीराम नाईकवाडे, नितीन सोळंके**

## युसूफवडगांव येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त साठे चौक येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि परिवर्तनवादी विचारांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या विचारांचा समाजातील सर्वसामान्य आणि वंचित घटकांवर झालेला प्रभाव यावेळी वक्त्यांनी अधोरेखित केला. या कार्यक्रमास उपसरपंच महेश लामतुरे,मन्मथ पाटील,किरण सातपुते,उमाकांत डोंगरे,श्याम रोडगे,मयुर खंडेलवाल,ओम लामतुरे,सोमनाथ वैरागे, आकाश वैरागे,प्रविण वैरागे,विकास जाधव,नागनाथ मुकदम,जयराज निशिगंध,शिवहार थळकरी,बाबू शिंदे,पत्रकार सचिन उजगरे सह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रम शांततापूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### मोगरा जिल्हा परिषद शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी




माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दिनांक १ ऑगस्ट २०२६ शनिवार रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी शाळेतील मुख्याध्यापक सुभाष घनघाव यांनी विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व परिवर्तनवादी कार्याची तसेच लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रजागृती आणि स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाची माहिती दिली.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम आणि प्रेरणादायी विचारांची रुजवण होईल अशी अपेक्षा सहशिक्षक हानुमंत पांढरपोटे यांनी सांगितले.

# आष्टी शहरात वराहमध्ये रोगाचा प्रादुर्भाव

## मृत वराहाची विल्हेवाट न लागल्याने दुर्गंधी, नागरिक संतप्त

### बसस्थानक, बाजारपेठेसह विविध भागांत मृत वराहाचा सडा; नगरपंचायतीने तातडीने कारवाई करावी, व्यापारी व नागरिकांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरामध्ये डुकरांना संसर्गजन्य रोगाची लागण झाल्याची भीती व्यक्त केली जात असून, शहरातील विविध भागांत डुकरे व त्यांची पिल्ले मृतावस्थेत पडून असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. विशेषतः बसस्थानक परिसर, मुख्य बाजारपेठ तसेच घाणीच्या ठिकाणी मृत डुकरांची विल्हेवाट वेळेत लावली जात नसल्याने काही तासांतच त्यांचे मृतदेह फुगून प्रचंड दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे व्यापारी, प्रवासी व नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नगरपंचायतीच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त केला जात आहे.

दिवसभर नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या भागांत मृत डुकरे पडून राहिल्यामुळे परिसरात असह्य दुर्गंधी निर्माण होत आहे. या दुर्गंधीमुळे नागरिकांना नाक मुठीत धरून मार्ग काढावा लागत असून, संसर्गजन्य आजार पसरण्याचीही भीती व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या वातावरणात अशा प्रकारे मृत प्राण्यांची विल्हेवाट न लावणे ही अत्यंत गंभीर बाब असून सार्वजनिक आरोग्य धोक्यात आल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

नागरिकांच्या मते, शहरात डुकरे पाळणाऱ्या संबंधित मालकांनी त्यांच्या मृत प्राण्यांची तात्काळ विल्हेवाट लावणे ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र अनेक ठिकाणी ही जबाबदारी टाळली जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नगरपंचायतीने संबंधित डुक्करपालकांना तातडीने नोटिसा बजावून मृत प्राण्यांची विल्हेवाट लावण्याचे आदेश द्यावेत. आदेशांचे पालन न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून कठोर पावले उचलावीत, अशी मागणी व्यापारी व नागरिकांनी केली आहे.

यासोबतच शहरात डुकरांमध्ये नेमका कोणता रोग पसरला आहे, याची पशुसंवर्धन विभागामार्फत तातडीने तपासणी करण्यात यावी. रोगाचा संसर्ग इतर प्राण्यांमध्ये किंवा माणसांमध्ये पसरणार नाही, यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना त्वरित राबविण्यात याव्यात, अशीही मागणी जोर धरत आहे.

आष्टी शहर स्वच्छ, सुरक्षित व रोगमुक्त ठेवण्यासाठी नगरपंचायत प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम हाती घेऊन मृत डुकरांची विल्हेवाट, परिसराचे निर्जंतुकीकरण आणि डुक्करपालकांवर कठोर कारवाई करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा या गंभीर प्रश्नामुळे नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने धम्मप्रवचन मालिका व वर्षावास प्रारंभ



माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या वतीन पुज्य भन्ते धम्मप्रिय चैत्यभूमी दादर मुंबई यांचा वर्षावास प्रारंभ व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन जिल्हा शाखा बीड पुर्व च्या अंतर्गत तालुका शाखा माजलगावच्या वतीन आषाढी पौर्णिमा ते आश्वीन षौर्णीमा या तिन महिन्याच्या वर्षावास कालावधीत विविध ठिकाणी शहरी व ग्रामीन भागामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या पवित्र ग्रंथाचे ग्रंथ वाचन चालु असलेल्या ठिकाणी विविध विषयांची धम्मप्रवचन मालीका राबवण्यात येत आहे या कार्यक्रमाचा प्रारंभ दि.२९ जुलै २०२६ वार बुधवार रोजी जिल्हा शाखा बीड पुर्व च्या वतीन राबवण्यात येत आसलेल्या विषय मालीका (आषाढ़ पौर्णिमा) विश्व गुरु तथागत भगवान बुद्ध या विषयाने सुरुवात करण्यात आली तसेच भारतीय बौद्ध महासभेसाठी खुप मोठ योगदान देणारे आद.के व्ही साळवे सर यांचा सेवापुर्ती निमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन सह पत्नीक विषेश सत्कार करण्यात आला ते नाथ हायीस्कुल नाथापुर येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत होते या प्रसंगी के व्ही साळवे सरांनी संस्थेकडे आसलेली दोन लाख बाहत्तर हजार रुपये संस्थेला दान दिल्याचे जाहीर केले तसेच शामभाऊ वाघमारे यांनी ही संस्थेकडे आसलेले सात हजार रुपये दान दिल्याचे जाहीर केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन ,जि.पर्यटन सचिव के व्ही साळवे , जिल्हा संघटक बी सी डोंगरे हे होते तर कार्यक्रमाच्या उदघाटक म्हणुन भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जि.संस्कार उपाध्यक्षा लिलाताई उजगरे,या होत्या तर अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे होते तर या कार्यक्रमासाठी भारतीय बोद्ध महासभेचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,जिल्हा संघटक शोभाताई भोजने ,शारदाताई तांगडे,,महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे,शहर अध्यक्षा मायाताई स्वामी,सद्दधम्म सेवासंघाचे अध्यक्ष अरुण पोटभरे,आप्पासाहेब भारस्कर,गवळी साहेब तसेच तालुक्यातुन धम्म उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्तीत होत्या या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ता संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी केले तर सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले या कार्यक्रमासाठी उपस्तीतांना भारतीय बौद्ध महासभेच्या शहर संरक्षण उपाध्यक्षा रेखाताई भारस्कर यांनी भोजनदान दिले तसेच भारतीय बौद्ध महासभेसाठी खुप मोठ योगदान देणारे आद.के व्ही साळवे यांचा सेवापुर्ती निमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन सह पत्नीक विषेश सत्कार करण्यात आला या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे महिला पुरुष तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या

संदीप क्षीरसागर होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, परिविक्षाधीन जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, भाजप नेत्या डॉ.ज्योतीताई घुंबरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, तहसीलदार, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासन आणि प्रशासन खंबीरपणे कार्यरत असून, मंत्री पंकजाताई मुंडे आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे बीड जिल्ह्याकडे सातत्याने विशेष लक्ष असल्यामुळे जिल्हा प्रशासन अधिक गतिमान झाले आहे. यावेळी स्व.अजितदादा पवार यांच्या कार्याची आठवण करून देताना डॉ.क्षीरसागर म्हणाले की, त्यांच्या कार्यपद्धतीतून लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी प्रेरणा घ्यावी. त्यांच्या प्रयत्नांमुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळाली. तसेच जिल्ह्याला सक्षम जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांसारखे सक्षम सनदी अधिकारी मिळाले. आजच्या शिबिराच्या माध्यमातून शासनाच्या योजना तळागाळातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिकाधिक प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

### मराठवाडा आदर्श शिक्षक

शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तसेच त्यांना वडवणीचे लोकप्रिय गटशिक्षणाधिकारी मा. राहुलजी भट्टी साहेब, श्री सतीश वाघमारे(संपादक सा. लोकमानस), वडवणी बॉईजचे केंद्रप्रमुख श्री.नितीन डोंगरदिवे, केंद्रीय मुख्याध्यापक श्री बापू धनवे, श्री सुनील मुंडे (चेअरमन) माजी केंद्रप्रमुख श्री. गणेश धायतीडक, श्री लक्ष्मण बहिरवाळ (जिल्हाध्यक्ष), श्री निलेश चव्हाण (तालुकाध्यक्ष) श्री अशोक भिलारे, श्री ज्ञानेश्वर वाव्हाळ, श्री. रामचंद्र मुंडे, श्री.सुरेश मुंडे, श्री सुप्रीम वंजारे, श्री सुरेश वाघमारे, श्री नामदेव प्रभाळे, श्री सचिन डावकर, श्री राजू दास राठोड, श्री कैलास दुधाने, श्री सावन उजगरे यांच्यासह शिक्षक मित्र परिवाराने पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### क्रांतिसिंह नाना पाटील,लोकशाहीर

यावेळी गौरवपूर्ण स्मरण करण्यात येणार आहे. तसेच शेतकरी, कामगार कष्टकरी जनतेच्या प्रश्नांवर गेली अनेक दशके प्रमाणिक लढा लढणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे तरी या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनक्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी प्रतिष्ठान व भारतीय शेतकरी कामगार पक्ष, बीड जिल्ह्याच्या वतीने राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांच्यासह जिल्हा चिटणीस भाई ड नारायण गोले पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयात

स्वीकार करावा, असे त्यांनी सांगितले.

उपप्राचार्य डॉ.एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते आणि प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या समतेच्या विचारांचे आणि लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रभक्ती, स्वराज्याच्या संकल्पनेचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कार्यकर्ता प्रामाणिक असेल तर

ओबीसी समाजाच्या हक्काच्या प्रश्नांची सोडवणूक केली आहे. यापुढेही नूतन जिल्हाध्यक्ष आणि कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांनी समता परिषदेचे ध्येय प्राप्त करण्यासाठी कार्यरत राहावे.

यावेळी पुढे बोलताना ड. सुभाष राऊत यांनी गेल्या पंचवीस वर्षाच्या काळात समता परिषदेच्या माध्यमातून बीड जिल्हाध्यक्ष म्हणून केलेले कार्य उपस्थितांना सांगून यापुढे देखील समता परिषदेचे कार्य असेच जोमाने चालू ठेवावे असे सांगितले. त्याचबरोबर लवकरच तालुका स्तरावर बैठका घेऊन नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात यावी अशी सूचना जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष अविनाश उगले यांना केली.

बैठकीचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष नितीन राऊत तर आभार प्रदर्शन जिल्हा कार्याध्यक्ष अविनाश उगले यांनी केले. याप्रसंगी सुमंत राऊत, धनंजय काळे, अजय राऊत, सावता काळे, गणेश काळे, संतोष रासवे, बाळू यादव, गोरख आखाडे, आभी मुडे, सचिन अरसुळे, बाळासाहेब काळे, मंगेश जमदाडे, कुमार शिंदे, महेश चौधरे, वैभव गोरे, संजय खेत्रे, अनिल चौधरी, डिगांबर घोडके, कृष्णा राऊत, महेश राऊत, कैलास काळे, नितीन नन्नवरे, रामेश्व सोडगे, युवराज गारदे, रामकिसन ढेगल, शिवराम शेटे, गोरख यादव, अशोक रासवे, रोहित सावंत, नवनाथ सुरवसे, अजय कोकाटे, सुमित उगले, अमोल उगले, संकेत सानप, सुशांत उगलमुगले, किरण मुंडे, प्रशांत मुंडे, बाळासाहेब लोखंडे, बाळकृष्ण आखाडे यांच्यासह समता परिषदेचे बीड जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आणि समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अण्णाभाऊ साठे जयंतीला

आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मा.सरपंच सालार पठाण, मार्केट कमिटीचे संचालक तुकाराम मोहोळकर, अशोक सुपेकर, रज्जाक पठाण, शहादेव कोटेकर, डॉ.गुंड रामा सातपुते, ग्रा. सदस्य रवी निकम, राजाभाऊ कोटेकर, पवन भोसले, सोनू पठाण, मुख्याध्यापक श्री. सातपुते सर, श्री. सानप सर, श्री. पाखरे सर, श्री. सय्यद सर, श्रीमती ठोंबरे मॅडम, श्री. पवार सर, श्रीमती शिंदे मॅडम, श्रीमती शेख मॅडम तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्रीमती जायभाय मॅडम, श्री .बांगर श्री. शेलार, श्री. जायभाय आणि विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद सज्जाद सर यांनी केले, तर आभार श्री. बळीराम पाखरे सर यांनी मानले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त युसूफवडगांव येथे ३४ जणांचे रक्तदान




युसूफवडगांव । प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त युसूफवडगांव येथे रामनगरीचा राजा गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सामाजिक उपक्रमात गावातील ३४ रक्तदात्यांनी रक्तदान करून अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केले.

गावातील हनुमान मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.रक्तदान हेच श्रेष्ठ दान असल्याची भावना व्यक्त करत अनेक युवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले. रामनगरीचा राजा गणेश मंडळाने जयंतीनिमित्त राबविलेल्या या अभिनव सामाजिक उपक्रमाचे ग्रामस्थांनी मनापासून कौतुक केले. भविष्यातही अशाच प्रकारचे समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबवावेत,अशी अपेक्षा गावकऱ्यांनी व्यक्त केली.

## शेतकऱ्यांना पीक विमा व सरसकट कर्जमाफी मिळेपर्यंत लढा सुरूच -आमटे



बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर केलेला हेक्टरी १७ हजार रुपयांचा पीक विमा तातडीने देण्यात यावा, सन २०२० पासून थकीत असलेली पीक विमा रक्कम अदा करावी तसेच कर्जमाफी योजनेतील त्रुटी दूर करून सरसकट कर्जमाफी लागू करावी, या मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे नेते राजेंद्र आमटे म्हणाले की, अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सरकारने हेक्टरी १७ हजार रुपये पीक विमा देण्याची घोषणा केली होती. राज्यातील अनेक भागांतील शेतकऱ्यांना लाभ मिळाला, मात्र बीड जिल्ह्यातील अनेक पात्र शेतकरी आजही या लाभापासून वंचित आहेत. तसेच सन २०२० मधील थकीत पीक विम्याची रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने ती तातडीने वितरित करावी. ते पुढे म्हणाले की, कर्जमाफी योजनेच्या यादीत अनेक त्रुटी असून पात्र शेतकऱ्यांची नावेच वगळण्यात आली आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांऐवजी २ लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळालेला नाही. शेतकऱ्यांना हक्काचा हेक्टरी १७ हजार रुपयांचा पीक विमा, थकीत विमा रक्कम आणि सरसकट कर्जमाफी मिळेपर्यंत शेतकरी हक्क मोर्चाचा लढा सुरू राहील,असा इशारा राजेंद्र आमटे यांनी दिला.



## छोटेवाडीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

**तालुक्यातील छोटेवाडी, रामनगर ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.प्रथमतः त्यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. आण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निम्मित गावात विविध झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.**

यावेळी सरपंच अंगदराव कटके, ग्रामविकास अधिकारी डि. के. ताटे,शालेय समिती अध्यक्ष दत्ता इंगळे ,वैजनाथ कटके, अमोल दळवी, शरद दळवी ,महेश सोळंके, सर्जेराव कटके, संतोष दळवी ,विनोद दळवी ,नितीन कटके, योगेश कटके, गोरख दळवी ,राम प्रधान ,आप्पा इंगळे ,श्याम कटके , राहुल माकडे, आत्माराम दळवी ,भागवत इंगळे, अशोक माळेकर ,गणेश राऊत, बाळासाहेब इंगळे, रितेश पौळ यांच्या सह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## रात्री १० नंतर पाटोदा बसस्थानकावरील कंट्रोल पॉइंट ओस!

### कर्मचारी गायब; मग बससेवा कोणाच्या भरोशावर?





पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील बसस्थानकावर रात्री १० नंतर कंट्रोल पॉइंटवर एकही कर्मचारी उपस्थित नसल्याचे चित्र वारंवार पाहायला मिळत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळेत प्रवाशांना बसची माहिती मिळत नाही, तर चालक-वाहकांनाही आवश्यक मार्गदर्शनासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

कंट्रोल पॉइंट हा बसस्थानकाचा महत्त्वाचा विभाग मानला जातो. बसचे वेळापत्रक, आगमन-प्रस्थान, आपत्कालीन परिस्थिती तसेच प्रवाशांच्या तक्रारींचे निराकरण यासाठी येथे कर्मचारी उपस्थित असणे आवश्यक असते. मात्र रात्री १० नंतर हा विभाग अक्षरशः ओस पडत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

रात्री उशिरा येणाऱ्या किंवा पुढील बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना कोणती बस कधी येणार, विलंब किती आहे किंवा पर्यायी व्यवस्था काय आहे, याची कोणतीही माहिती मिळत नसल्याची तक्रार आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील प्रवाशांना याचा मोठा फटका बसत आहे.

प्रवाशांचा प्रश्न असा आहे की, कंट्रोल पॉइंटवर कर्मचारीच नसतील तर रात्रीची बससेवा नेमकी कोणाच्या भरोशावर सुरू आहे? राज्य परिवहन महामंडळाने या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन रात्रीच्या वेळेतही कंट्रोल पॉइंटवर कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी प्रवासी आणि नागरिकांकडून होत आहे.

### नागरिकांची मागणी

रात्री १० नंतर कंट्रोल पॉइंटवर कर्मचारी कायमस्वरूपी तैनात करावेत. बस आगमन-प्रस्थानाची अचूक माहिती प्रवाशांना उपलब्ध करून द्यावी. रात्रीच्या बससेवेसाठी स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था कार्यान्वित करावी. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक तपासणी करून निष्काळजीपणावर कारवाई करावी.

# ॲग्रीस्टॅक डेटा अपडेट नसल्याने केवायसी प्रक्रियेत गोंधळ

## शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा लाभ धोक्यात?

पुणे / प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत केवायसी प्रक्रिया सुरू असताना अनेक शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण असूनही पोर्टलवर तांत्रीक अडचणीचा संदेश दिसत असल्याने केवायसी पूर्ण होत नाही. त्यामुळे आपले सरकार सेवा केंद्रांवर मोठ्या रांगा लागल्या असून शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे.

यामुळे आपले सरकार सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांच्या मोठ्या रांगा लागत असून, तासनतास प्रतीक्षा करूनही अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या लाभार्थ्यांमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संलग्न सेवा सहकारी संस्था, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका आणि खासगी बँकांमधील कर्जदार शेतकऱ्यांचा समावेश आहे. कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी प्रत्येक पात्र शेतकऱ्याने आधार प्रमाणीकरणासह केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केवायसी यशस्वी झाल्यानंतरच कर्जमाफीची रक्कम डीबीटी द्वारे संबंधित कर्ज




खात्यात जमा केली जाणार आहे. शासनाच्या सूचनेनुसार, शेतकऱ्यांनी विशिष्ट लाभार्थी क्रमांक, आधार कार्ड, कर्ज खाते आणि बँक पासबुक घेऊन जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण असतानाही पोर्टलवर असा संदेश दिसत आहे. त्यामुळे केवायसी प्रक्रिया पुढे सरकत नसल्याने पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करत आहेत. अनेक

### वयस्कर शेतकरी अडचणीत

६० वर्षांवरील अनेक शेतकऱ्यांच्या बोटांचे ठसे बायोमेट्रिक मशीनवर उमटत नसल्याने त्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होत नाही. परिणामी, अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहावे लागण्याची भीती निर्माण झाली आहे. या समस्येवर शासनाने पर्यायी प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही दुसरी समस्या समोर येत आहे. तांत्रिक अडचणींमुळे केवायसीची पावती किंवा प्रिंटच निघत नसल्याने प्रक्रिया पूर्ण झाली की नाही, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेकांना पुन्हा पुन्हा सेवा केंद्रांवर जावे लागत असून वेळ आणि पैशाचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. पोर्टलची संथ गती आणि वारंवार येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत आहे. तासनतास प्रतीक्षा करूनही केवायसी पूर्ण न होणे किंवा प्रिंट न मिळाल्याने अनेक शेतकरी नाराजी व्यक्त करत आहेत.

## कापसात पातेगळ आणि बोंडगळ समस्या



कापूस पिकात आपत्कालीन परिस्थितीत वेगवेगळ्या कारणांमुळे पातेगळ आणि बोंडगळ सारख्या समस्या उद्भवतात. या समस्येचे विविध कारणे आणि त्यावरील व्यवस्थापन उपाय जाणून घेतल्यास यावर मात करता येते.

पातेगळ आणि बोंडगळ होण्याची कारणे : कापूस पिकाते वेगवेगळ्या कारणामुळे पातेगळ आणि बोंडगळ दिसून येते. जास्त किंवा कमी झालेला पाऊस पातेगळ आणि बोंडगळ होण्यास कारणीभूत ठरते, तसेच तापमानातील अचानक झालेला चढउतार हे सुद्धा महत्वाचे कारण आहे. कापूस पिकाच्या वाढीच्या अवस्थेत पोषक घटकांसाठी होणारी स्पर्धा. कापूस पिकात होणारा किडींचा प्रादुर्भाव. शेतात पाणी साचून राहणे किंवा जमिनीतील ओलावा कमी होणे. सूर्यप्रकाशासाठी होणारी पिकांची स्पर्धा

पातेगळ आणि बोंडगळ समस्येवर उपाय : आकस्मिक परिस्थितीत कापूस पिकात पुरेसे अन्न आणि पाणी व्यवस्थापन करावे. पिकात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे. नॅफ्थाइल ॲसिटिक ॲसिड २० पीपीएम याप्रमाणात फवारणी करावी. पिकाची वाढ नियंत्रण करून शेंडा खुडणी करावी. पोटॅशियम नायट्रेटची १ टक्के याप्रमाणात फवारणी करावी. पिकामध्ये भरपूर हवा व सूर्यप्रकाश मिळावा म्हणून व्यवस्थापन करावे. पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी त्यानंतर १५ ते २० दिवसाच्या अंतराने दुसरी आणि तिसरी वेचणी करावी. कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेत न्यावे व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा, जेणेकरून त्यात दडलेल्या किडींच्या अवस्था नष्ट होतील.

## मुरघास निर्मिती, देते जनावरांसाठी वर्षभर चाऱ्याची हमी!

पशुपालन व्यवसाय यशस्वी करायचा असल्यास सर्वात महत्त्वाचे आहे ते म्हणजे पशुखाद्य. कारण जनावरांना योग्य प्रमाणात आणि चांगल्या प्रतिचे पशुखाद्य पुरविले तर दुधाचे चांगले आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळते. जनावरांना देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या पशुखाद्यांपैकी हिरवा चाऱ्यात सर्वात अधिक पौष्टिक घटक असतात. परंतु हा हिरवा चारा जनावरांना वर्षभर उपलब्ध होईलच असे नाही. यावर उपाय म्हणजे मुरघास निर्मिती. 'मुरघास म्हणजे हवा विरहित जागेत किण्वनीकरण (आंबवून) तयार करून साठवलेला चारा होय.' या पद्धतीमुळे हिरवा चारा त्यातील पौष्टिक घटकांसोबत जास्त काळपर्यंत टिकवून ठेवता येतो.

मुरघासचे फायदे : हिरवा चारा त्याच्या गुणधर्मासह टिकविला जातो. वाळलेल्या चाऱ्यापेक्षा साठवणुकीस जागा सुद्धा कमी लागते. मुरघासला वाळवण्याची गरज नसल्यामुळे पावसाळ्यात सुद्धा तयार करता येतो. मुरघास रुचकर, कसदार, चवदार असल्यामुळे जनावरे आवडीने खातात तसेच पचायला हलका असतो. एकाच हंगामात जास्तीत जास्त मुरघास तयार करून दुसऱ्या हंगामात जमीन इतर पिकांसाठी वापरता येते. खरीप आणि रब्बी हंगामातील जास्तीचा हिरवा चारा साठवून चारा टंचाईच्या काळात वापरता



येतो. पशुखाद्यावरील खर्च कमी होऊन दूध उत्पादनात सातत्य राहते. म

वापरण्यात येणारी पिके : एकदल पिके - मका, ज्वारी, बाजरी, ओट आणि गवत पिके. द्विदल पिके - लुर्सन, चवळी, बरसीम, गवार, वाल आणि पावटा.

मुरघास तयार करण्यासाठी हे वापरा : प्लॅस्टिक बॅग ५ किलो, १० किलो, ५० किलो, १०० किलो, ५०० किलो, १००० किलो अशा प्रमाणात मुरघास बॅग उपलब्ध आहेत. या बॅग्स वारंवार वापरात येऊ शकतात. हाताळायलाही सोप्या असतात. ड्रम सायलेज : प्लॅस्टिक ड्रमची क्षमता १००ते ३०० लिटरपर्यंत असते. ज्या ठिकाणी छोट्या प्रमाणात मुरघास तयार करावयाचा आहे आणि साखळी पद्धतीने वापरायचा आहे, त्या ठिकाणी ही पद्धत उपयुक्त आहे.

मुरघास तयार करण्याची प्रक्रिया : चारापिके ५० टक्के फुलोऱ्यात असताना कडबाकुट्टी यंत्राने लहान तुकडे करतात. एकदलवर्गीय पिकापासून आणि द्विदल वर्गीय पिकापासून मुरघास बनविताना ४:१ प्रमाण घ्यावे यामुळे रुचकर मुरघास बनतो. एकदलवर्गीय पिकापासून मुरघास बनवितेवेळी एक किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून हे मिश्रण चारा कुट्टीवर शिंपडतात. द्विदलवर्गीय पिकापासून मुरघास बनविताना त्यावर गूळ द्रावणाचे मिश्रण शिंपडतात. त्यासाठी एक किलो गूळ १०० लिटर पाण्यात विरघळवून द्रावण तयार केले जाते. कुट्टी तयार करून खड्ड्यात एक फुटापर्यंत थर येईल अशा पद्धतीने भरावे. प्रत्येक थरानंतर वर सांगितलेले द्रावण शिंपडावे. चाराकुट्टीचा थर खड्ड्यात भरताना दाब द्यावा, त्यामुळे चाऱ्यामध्ये हवा राहत नाही. अशा पद्धतीने थरावर थर देत जाऊन खड्डा भरावा. त्यावर वाळलेले गवत किंवा कडबा यांच्या मदतीने आच्छादन करतात. शेण व मातीच्या मिश्रणाने नंतर लिंपून गोलघुमटासारखा आकार द्यावा. साधारण दोन महिन्यांनी चांगला, स्वादिस्ट, रुचकर असा पौष्टिक मुरघास तयार होतो .

जनावरांना किती मुरघास द्यावा? : गाई व म्हशीला २० ते २५ किलो मुरघास द्यावा. हा चारा दिवसातून २ ते ३ वेळा द्यावा. शेळी आणि मेंढीला ५०० ते ७०० ग्राम चारा द्यावा. दुधाळ जनावरांना मुरघास चारा धारा काढल्यानंतर द्यावा. चारा जर जास्तच आंबट किंवा आम्लयुक्त असेल तर तो थोडा वेळ सुकून द्यावा.

## पावसाळ्यात पिकांची काळजी

राज्यातील अनेक भागांत झालेल्या मुसळधार पावसामुळे खरीप पिकांना फटका बसला आहे. अनेक शेतांमध्ये पाणी साचणे, माती वाहून जाणे, अन्नद्रव्यांचे नुकसान, रोगांचा प्रादुर्भाव अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत घाईघाईने कोणतेही निर्णय न घेता शेताची पाहणी करून योग्य उपाययोजना केल्यास पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकते.

कोणती लक्षणे तपासावी? : पाऊस थांबल्यानंतर सुरक्षित परिस्थितीत शेताची पाहणी करावी. शेतात कुठे पाणी साचले आहे का, माती वाहून गेली आहे का, मुळे उघडी पडली आहेत का, रोपे आडवी झाली आहेत का किंवा पाने पिवळी पडू लागली आहेत का, याची तपासणी करावी. विशेषतः सखल भागातील पिकांकडे अधिक लक्ष द्यावे, कारण या भागात नुकसान जास्त होण्याची शक्यता असते.

तातडीने निचरा : खरीप पिकांच्या मुळांना पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन मिळणे आवश्यक असते. शेतात दीर्घकाळ पाणी साचून राहिल्यास मुळे कुजतात, अन्नद्रव्यांचे शोषण कमी होते आणि पिकाची वाढ थांबते. त्यामुळे शक्य असल्यास चर, नाले किंवा उपलब्ध साधनांच्या मदतीने अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मात्र जमीन खूप ओली असताना शेतात यंत्रे किंवा ट्रॅक्टर घेऊन जाणे टाळावे, अन्यथा माती अधिक घट्ट होऊन भविष्यातील वाढीवर परिणाम होऊ शकतो.

निचरा झाल्यानंतर. पावसानंतर लगेच मशागत किंवा फवारणीची घाई करू नये. माती हातात दाबल्यावर तिचा घट्ट गोळा होत असेल किंवा अवजारांना चिकटत असेल, तर जमीन अजूनही



कामासाठी तयार झालेली नसते. जमीन वाफशावर आल्यानंतरच पुढील कामे करावीत.

खते वाहून गेल्यास.: मुसळधार पावसामुळे नत्र, पालाश आणि गंधकासारखी अन्नद्रव्ये वाहून जाण्याची शक्यता असते. विशेषतः पावसापूर्वी खतांचा वापर केला असेल तर त्यातील काही भाग वाहून गेलेला असू शकतो. त्यामुळे पिकात अन्नद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे दिसत आहेत का, याची पाहणी करावी. आवश्यक असल्यास माती किंवा पानांची तपासणी करूनच पुढील खत व्यवस्थापनाचा निर्णय घ्यावा. अंदाजाने पुन्हा खतांचा वापर करू नये.

कीड रोगांवर लक्ष ठेवा : सततचे ओलसर वातावरण बुरशीजन्य आणि जिवाणूजन्य रोगांसाठी पोषक ठरते. त्यामुळे मुळकुज, खोडकुज, पानांवरील डाग, खोडावरील संसर्ग किंवा अचानक कोमेजणारी झाडे दिसत आहेत का, याची नियमित तपासणी करावी. पिके कमकुवत झाल्यास काही किडींचाही प्रादुर्भाव वाढू शकतो. त्यामुळे पुढील काही दिवस शेताची सातत्याने पाहणी करून लक्षणे दिसताच तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार उपाययोजना करावी.

मातीची रचना सुधारण्यावर भर : मुसळधार पावसामुळे माती घट्ट होऊ शकते. जमीन वाफशावर आल्यानंतर आवश्यक असल्यास उथळ मशागत करून वरचा कडक थर फोडावा. त्यामुळे मुळांपर्यंत हवा पोहोचण्यास मदत होते. मात्र अनावश्यक खोल नांगरणी टाळावी.

गरज असल्यास पुनर्लागवड : ज्या ठिकाणी रोपे पूर्णपणे वाहून गेली आहेत किंवा उगवण मोठ्या प्रमाणात नष्ट झाली आहे, त्या ठिकाणी उरलेला हंगाम, उपलब्ध बियाणे आणि अपेक्षित उत्पादन लक्षात घेऊन शक्य असल्यास पुनर्लागवडीचा निर्णय घ्यावा. काही ठिकाणी फक्त रिकाम्या जागा भरून काढणे पुरेसे ठरू शकते. मुसळधार पावसानंतर घाई न करता शेताची पाहणी, योग्य निचरा, रोग-किडींचे निरीक्षण आणि परिस्थितीनुसार वेळेवर उपाययोजना केल्यास खरीप पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी करता येते आणि उत्पादन वाचविणे शक्य होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७७ : शिवाजीमहाराज तामिळनाडूतील विरुधाचलम येथे देवदर्शनास गेले. तिथे त्यांनी डच प्रतिनिधींशी बोलणी केली.
१७९० : अमेरिकेत पहिली जनगणना सुरू झाली.
१८२० : जॉन टिंडाल ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ४ डिसेंबर १८९३)
१८३५ : अलीशा ग्रे वेस्टर्न इलेक्ट्रिक कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २१ जानेवारी १९०१)
१८६१ : आचार्य प्रफुल्लचंद्र रे भारतीय रसायनशास्त्रज्ञ, देशातील वैज्ञानिक चळवळीचे प्रणेते, त्यांनी 'बेंगॉल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स' ही कंपनी काढली. १८९६ मधे त्यांनी पारा आणि नायट्रोजन यांच्या संयोग करुन मर्क्युरस नायट्रेटची निर्मिती केली. त्यांना 'मास्टर ऑफ नायट्रेटस' म्हणत असत. (मृत्यू: १६ जून १९४४)
१८७० : जगातील पहिल्या भूमिगत ट्यूब रेल्वेची टॉवर सबवे ची लंडन मध्ये सुरवात झाली.
१८७६ : पिंगाली वेंकय्या भारतीय तिरंग्याचा रचनाकार (मृत्यू: ४ जुलै १९६३)
१९१० : पुरुषोत्तम शिवराम रेगे कादंबरीकार, नाटककार, कवी आणि समीक्षक (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९७८)
१९१८ : दादा जे. पी. वासवानी आध्यात्मिक गुरू, सिंधी धर्मीयांतील गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व, साधू वासवानी यांचे पुतणे व शिष्य
१९२३ : काल्व्हिन कूलिज अमेरिकेचे ३० वे राष्ट्राध्यक्ष बनले. हे अतिशय मोजके बोलण्यासाठी प्रसिद्ध होते.
१९४१ : ज्यूल्स हॉफमन नोबेल पारितोषिक विजेते फ्रेन्च जीवशास्त्रज्ञ
१९५४ : दादरा व नगर हवेली हा प्रांत भारतीयांनी पोर्तुगीजांकडुन ताब्यात घेतला.
१९७९ : नगर जिल्ह्यातील डॉ. रजनीकांत आरोळे व त्यांच्या पत्नीला मॅगसेसे पुरस्कार जाहीर केला.
१९९० : इराकने कुवेतवर आक्रमण केले.
१९९६ : अटलांटा ऑलिंपिक स्पर्धेत अमेरिकेच्या मायकेल जॉन्सनने दोनशे आणि चारशे मीटरच्या शर्यतीत, एकाच ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदके पटकावून ऑलिंपिकच्या इतिहासातील पहिला खेळाडू होण्याचा मान पटकवला.
२००१ : ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेतील विजेता पुल्लेला गोपीचंद याची भारतीय क्रीडाक्षेत्रातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या राजीव गांधी खेल रत्न पुरस्कारासाठी निवड.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२० : जॉन टिंडाल ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ४ डिसेंबर १८९३)
१८३४ : स्टॅच्यू ऑफ लिबर्टी चे रचनाकार फ्रेडेरीक ऑगस्टे बर्थोल्ड यांचा जन्म. (मृत्यू: ४ ऑक्टोबर १९०४)
१८३५ : अलीशा ग्रे वेस्टर्न इलेक्ट्रिक कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २१ जानेवारी १९०१)
१८६१ : आचार्य प्रफुल्लचंद्र रे भारतीय रसायनशास्त्रज्ञ, देशातील वैज्ञानिक चळवळीचे प्रणेते, त्यांनी 'बेंगॉल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स' ही कंपनी काढली. १८९६ मधे त्यांनी पारा आणि नायट्रोजन यांच्या संयोग करुन मर्क्युरस नायट्रेटची निर्मिती केली. त्यांना 'मास्टर ऑफ नायट्रेटस' म्हणत असत. (मृत्यू: १६ जून १९४४)
१८७६ : पिंगाली वेंकय्या भारतीय तिरंग्याचा रचनाकार (मृत्यू: ४ जुलै १९६३)
१८७७ : भारतीय वकील आणि राजकारणी रविशंकर शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ३१ डिसेंबर १९६५)
१८९२ : वॉर्नर ब्रदर्स चे सहसंस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर १९७८)
१९१० : पुरुषोत्तम शिवराम रेगे कादंबरीकार, नाटककार, कवी आणि समीक्षक (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९७८)
१९१८ : दादा जे. पी. वासवानी आध्यात्मिक गुरू, सिंधी धर्मीयांतील गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व, साधू वासवानी यांचे पुतणे व शिष्य
१९२९ : भारतीय राजकारणी विद्याचरणा शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ जुन २०१३)
१९२२ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय उद्योगपती जी. पी. बिरला उर्फ गंगाप्रसाद बिरला यांचा जन्मदिन.
१९३२ : अमेरिकन फुटबॉल लीग आणि वर्ल्ड चॅम्पियनशिप टेनिसचे सहसंस्थापक लमेर हंट यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर २०१६)
१९४१ : ज्यूल्स हॉफमन नोबेल पारितोषिक विजेते फ्रेन्च जीवशास्त्रज्ञ
१९४५ : भारतीय शिक्षक आणि कार्यकर्ते बंकर रॉय यांचा जन्म.
१९५६ : गुजरात राज्याचे राजकारणी व विद्यमान मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचा जन्मदिन.
१९५८ : अर्शद अयुब भारतीय क्रिकेटपटू आणि व्यवस्थापक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : हेन्री (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म: १९ सप्टेंबर १५५१)
१७८१ : सखारामबापू बोकील पेशवाईतील मुत्सद्दी, साडेतीन शहाण्यांपैकी एक पूर्ण शहाणे (जन्म:)
१९२२ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल स्कॉटिश अमेरिकन पदार्थ वैज्ञानिक, टेलिफोनचा संशोधक (जन्म: ३ मार्च १८४७)
१९३४ : पॉल फॉन हिन्डेनबर्ग जर्मनीचे दुसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २ आक्टोबर १८४७)
१९७९ : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते व गायक करन दिवाण यांचे निधन.
१९७८ : मोनॅको ग्रांप्री चे स्थापक ॲन्टोनी नोगेस यांचे निधन. (जन्म: १३ सप्टेंबर १८९०)
१९८० : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय शिल्पकलेचे प्रणेते भारतीय शिल्पकार आणि चित्रकार रामकिंकर बैज यांचे निधन.
२०१० : भारतीय हिंदी, पंजाबी आणि गुजराती भाषिक चित्रपटांमध्ये काम करणारे अभिनेते व चित्रपट निर्माता कमल कपूर यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# नियोजन समितीच्या बैठकीत मंत्री पंकजाताई मुंडेंची जिल्ह्यासाठीची तळमळ

## सौहार्दपूर्ण वातावरण ठेवा, बीडची प्रतिमा जपा, विकासाला गती द्या

बीड। प्रतिनिधी

राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि आपल्या जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून सुनेत्रावहिनी पवार या जबाबदारीने काम करत असून, दिवंगत अजितदादा यांच्या कार्याचा वारसा त्या समर्थपणे पुढे नेत आहेत. दादांच्या कामाची शैली आणि कामांचा धडाका त्यांच्यात दिसतो आहे अशा शब्दांत पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पालकमंत्र्यांचे अभिनंदन केले. सौहार्दपूर्ण वातावरण ठेवा, जिल्ह्याची बदनामी होणार नाही याची सर्वांनी खबरदारी घ्यावी असं सांगत जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा नियोजन विकास समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. सुरुवातीला सुनेत्राताई पवार यांचे ना. पंकजाताईंनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, कठीण प्रसंगातून सावरत असतानाही सुनेत्रावाहिनी पवार यांनी विकासकामांवर लक्ष केंद्रीत केले. दिवंगत अजितदादांच्या कार्यशैलीचा वारसा त्या पुढे नेत असून, जनतेच्या प्रश्नांबाबत संवेदनशीलपणे काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होईल असा मला आपल्याला विश्वास आहे.

बीड जिल्ह्याबाबत बाहेर चुकीची प्रतिमा निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. हा जिल्हा कष्टकरी, प्रेमळ आणि धार्मिक परंपरा जपणाऱ्या लोकांचा तसेच महिला धार्जिण जिल्हा आहे. काही घटनांमुळे संपूर्ण जिल्ह्याची बदनामी होऊ नये, यासाठी लोकप्रतिनिधींनी विशेष जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच सर्वांचे समान ध्येय असावे. बीडची प्रतिमा जपा, विकासाला गती द्या असा मोलाचा सल्ला पंकजाताई मुंडे यांनी बैठकीत दिला. याप्रसंगी पंकजाताईंनी सांगितले की, आमदारांनी आपापल्या मतदारसंघातील प्रत्येक गावात शाळा, प्राथमिक आरोग्य आणि स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता चांगला करण्याकडे प्राधान्य द्यावे. याशिवाय शाळा, अंगणवाडी आणि आरोग्य केंद्रांच्या कामकाजाचे नियमित ऑडिट होऊन विकास प्रत्यक्ष दिसला पाहिजे. प्रशासकीय यंत्रणेनेही अधिक जनताभिमुख होण्याची गरज आहे. तालुकास्तरावरील अधिका-यांनी आपल्या कार्यालयात उपलब्ध राहून नागरिकांची कामे तत्परतेने मार्गी लावावीत, असे त्या म्हणाल्या. यावेळी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या कामाचे त्यांनी कौतुक केले. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय राहिल्यास जिल्ह्याचा विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

२०१३ च्या दुष्काळाच्या आठवणींना उजाळा देत पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, त्या काळात जिल्ह्यावर गंभीर संकट आले होते. त्यावेळी मोठ्या प्रमाणावर टँकर सुरू करावे लागले होते. यंदाही पाच सहा दिवसापूर्वी पर्यंत अशीच परिस्थिती पुन्हा येते की काय अशी शक्यता वाटत होती. मात्र आता पाऊस झाला आहे. आपल्या पालकमंत्री सुनेत्रावहिनी पाऊस घेऊन आल्या आहेत अशी टिप्पणी करत त्यांनी उपस्थितांमध्ये हास्याची लकेर उमटवली.

# केकत पांगरीतील १०० एकर गायरान जमीन अतिक्रमणाच्या विळख्यात

## ग्रामस्थांचा संताप, मुख्यमंत्र्यांकडे न्यायाची हाक

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील केकत पांगरी येथील सार्वजनिक गायरान जमिनीवर झालेल्या कथित अतिक्रमणामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. गावातील एकूण १२० एकर गायरान जमिनीपैकी २० एकर जमीन शासनाने भूमिहीन कुटुंबांना दिली असून, उर्वरित सुमारे १०० एकर गायरान जमीन अतिक्रमणाच्या विळख्यात गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.सार्वजनिक मालमत्तेवर खुलेआम अतिक्रमण होत असताना प्रशासन नेमके झोपले आहे का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. गायरान जमीन ही संपूर्ण गावाची मालमत्ता असताना तिचे संरक्षण करण्यात यंत्रणा अपयशी ठरल्याची भावना व्यक्त होत आहे.

या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून सर्व कथित अतिक्रमणे तातडीने हटवावीत, अतिक्रमण करणाऱ्यांवर तसेच दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी थेट महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.गायरान जमीन ही कोणाची जहागीर नाही; ती गावकऱ्यांच्या हक्काची सार्वजनिक संपत्ती आहे. त्यामुळे या प्रकरणात विलंब न करता ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा ग्रामस्थ लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहेत. आता शासन आणि प्रशासन सार्वजनिक जमिनीचे संरक्षण करते की अतिक्रमणाकडे



डोळेझाक करते, याची कसोटी लागणार आहे. हे निवेदन माननीय उपमुख्यमंत्री सुनेत्राताई वहिनीसाहेब पवार यांना देण्यात आले. यावेळी केकत पांगरी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये भगवान राठोड, घनशाम गोबारे,ग्रामसेवक दिपक पांडुळे, शरद लगड, रामप्रसाद शेलकर, वैजीनाथ उगले, उमेश राख, विशाल शेलकर, वैभव लगड, सिद्धेश्वर शेलकर, महेश लगड, भगवान राऊत, पवन शेलकर, गणेश नांदरे, मल्हारी अंधारे, विष्णू खेत्रे, अविनाश शिंदे, ऋषी गोरे, आदिनाथ लगड, अभिषेक खाडे, लक्ष्मण फसले, राजेंद्र इंगळे आणि दत्ता फसले यांचा समावेश होता. ग्रामस्थांनी गायरान जमिनीवरील कथित अतिक्रमणाची सखोल चौकशी करून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

# वसमतमध्ये १९ गोवंश जप्त प्रकरण: राष्ट्रवादीच्या उपनगराध्यक्षांवर गुन्हा



हिंगोली। प्रतिनिधी

वसमतच्या जवळा खंदारबन शिवारातील १९ गोवंश प्रकरणात थेट उपनगराध्यक्षांवरच गुन्हा दाखल झाल्याने राजकिय वर्तुळात खळबळ उडली आहे. सकल हिंदू समाजाच्या मोर्चामुळे वातावरण चांगलेच तापले आहे. तर दुसरीकडे आपला या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याची प्रतिक्रिया उपनगराध्यक्ष इमरानअली यांनी दिली आहे.

वसमतच्या जवळा खंदारबन शिवारात वसमत ग्रामीण पोलिसांनी शेतात टाकलेल्या छाप्यामध्ये तब्बल १९ गोवंश ताब्यात घेण्यात आली. चारा पाण्याविना ही जनावरे बांधल्याचे दिसून आले असून त्या ठिकाणी अतिशय दलदल होती. सदर गोवंश कत्तलीसाठी नेली जात असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यावरून पोलिसांनी वसमतचे राष्ट्रवादीचे उपनगराध्यक्ष सय्यद इमरानअली यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणामुळे जिल्हाभरात एकच खळबळ उडाली असून हिंदू संघटनांमधून तिव्र असंतोष निर्माण झाला आहे. या प्रकरणात दोषींवर कडक कारवाई करावी तसेच मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करीत सकल हिंदू समाजाच्या वतीने बंद पुकारण्यात आला. तर भाजपाच्या वतीनेही निवेदन देऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करून यामध्ये आणखी कोणाचा हात आहे का? हे शोधून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल गुन्हाशी आपला कोणताही संबंध नाही. केवळ राजकिय हेतू साध्य करण्यासाठी व विरोधकांच्या महत्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपले नाव ओढले गेले आहे. प्रशाकिय आणि कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर करून आपली प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न आहे. सत्य निश्चित समोर येऊन आपले निर्दोषत्व सिध्द होईल असा विश्वास आहे. आपल्या विरोधात पसरविलेल्या अफवांवर विश्वास ठेऊ नये.

# मावेजा दिला नाही; अधिकाऱ्यांना खंडपीठाच्या नोटीस

संभाजीनगर । प्रतिनिधी

पाझर तलावासाठी जमीन संपादित करून सुद्धा मावेजा न मिळाल्याने माननीय मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस. मौजे चिखली तालुका आष्टी येथील शेतकरी पप्या फंशा काळे यांची दोन एकर शेती सन २०१२ मध्ये पाझर तलावासाठी संपादित करण्यात आली होती. सदरील जमीन संपादित करताना याचिकाकर्ता यांना कोणताही मावेजा देण्यात आलेला नाही.

म्हणून त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मावेजा मिळणे बाबत लेखी व तोंडी विनंती केली होती. तरीही देखील सन २०१२ पासून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या नाराजीने याचिकाकर्ता पप्या फंशा काळे यांनी ऍडव्होकेट कमालोद्दीन एन फारुकी यांच्यामार्फत माननीय मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रेट याचिका दाखल केली होती. सदरील याचिकेची सुनावणी दिनांक २३.०७.२०२६ रोजी माननीय मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील न्यायमूर्ती श्री नितीन बी. सूर्यवंशी आणि माननीय न्यायमूर्ती श्री आबासाहेब डी.शिंदे यांच्या खंडपीठांसमोर झाली असता जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी, विशेष भूसंपादन विभाग पाटोदा, उपविभागीय जलसंधारण अधिकारी आष्टी, उपअधीक्षक भूमी अभिलेख आष्टी यांना नोटीसा काढण्यात आलेले सदरील याचिकेची पुढील सुनावणी दिनांक २०.०८.२०२६ ठेवण्यात आलेली आहे. याचि कर्ता पप्या फंशा काळे यांच्यावतीने एडवोकेट कमालोद्दीन एन फारुकी यांनी काम पाहिले. तर शासनाच्या वतीने एडवोकेट श्री एस आर वाकडे यांनी काम पाहिले.

# नाशिक-पुणे रेल्वे मार्गासाठी ९ ऑगस्टला चक्काजाम आंदोलन : आ.तांबे

संगमनेर। प्रतिनिधी

नाशिकपुणे सरळ रेल्वे मार्गाच्या मागणीसाठीचा लढा आता अधिक तीव्र होणार असून, आगामी ९ ऑगस्ट रोजी (क्रांती दिन) सकाळी ९ वाजता नाशिकपुणे महामार्गावरील विविध ठिकाणी एकाच वेळी 'चक्काजाम' जनआंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा आमदार सत्यजीत तांबे यांनी केली आहे. केंद्र सरकारचे या महत्त्वपूर्ण प्रकल्पाकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन पुकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार तांबे म्हणाले, नाशिकपुणे सरळ रेल्वे हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा नेत्याचा विषय नसून सामान्य नागरिकांच्या भविष्यासाठीचा लढा आहे. रेल्वेसारखे मोठे प्रकल्प शतकातून एकदाच उभे राहतात, आणि आज जर ही संधी हुकली तर पुढील अनेक पिढ्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल.

सध्या वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था आणि अपघातांमुळे दोन-तीन तासांचा प्रवास सहा ते सात तासांपर्यंत लांबत असून विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक व व्यावसायिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या सरळ रेल्वे मार्गाची गरज तीव्र बनली आहे. या रेल्वेमार्गामुळे सिन्नर, संगमनेर, अकोले, नारायणगाव, मंचर, राजगुरूनगर आणि चाकण परिसराच्या विकासाला नवी गती मिळेल, तसेच पुणे व नाशिक शहरांवरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ९ ऑगस्ट रोजी चाकण, राजगुरूनगर, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, घारगाव, संगमनेर, सिन्नर आणि नाशिक येथे एकाच वेळी हे चक्काजाम आंदोलन होईल.

सरकारला जागे करण्यासाठी जनतेने मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले पाहिजे. इतिहास साक्षी आहे की, जनता एकजूट झाली की सरकारला निर्णय घ्यावाच लागतो, असे आवाहन आमदार तांबे यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर:नागरिकांचा प्रतिसाद

हिंगोली। प्रतिनिधी

कळमनुरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी ता ३१ आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कळमनुरी येथील केसरीनंदन मंगल कार्यालयात आयोजित या शिबिरास आमदार डॉ. प्रज्ञा सातव, माजी आमदार गजानन घुगे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते, तहसीलदार जीवककुमार कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजना, सेवा व सुविधांची माहिती देण्याबरोबरच पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण करण्यात आले. यावेळी जिवंत सातबारा उतारे १ हजार १५१, वाटणीपत्रावरील नोंदणी फीमध्ये सवलत/लाभ १३१, पाणंद रस्ते १९, अतिक्रमण नियमानुकूल अर्ज ३८६, घरकुल लाभार्थी ७३, राज्यस्तरीय योजनांचे लाभ ५ हजार ६०८, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शासकीय योजनांचे लाभ २० आणि बसच्या मोफत पासचे वाटप १२५ असे एकूण ७ हजार ५१३ लाभांचे वितरण करण्यात आले. शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहोचविणे, नागरिकांच्या विविध प्रशासकीय अडचणींचे निराकरण करणे आणि महसूल विभागाच्या सेवा सुलभ व गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देणे, हा या समाधान शिबिराचा प्रमुख उद्देश असल्याचे उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भूते यांनी सांगितले. यावेळी उपस्थित नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन योजनांची माहिती घेतली. तसेच शासकीय योजनांसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे व निकष याची माहिती ही नागरिकांनी घेतली. यावेळी आमदार डॉ. प्रज्ञा सातव तसेच माजी आमदार गजानन घुगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिबिरास विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाधान शिबिरामधून एकाच वेळी मोठ्या संख्येने पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळाल्यामुळे लाभार्थ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले.

# अभिजित दिपके यांची प्रकृती बिघडली

## नागरिकांशी संवाद साधताना मळमळ आणि उलटीचा त्रास

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

'कॉकरोच जनता पार्टी'चे नेते अभिजीत दिपके यांच्या आरोग्याबाबत एक महत्त्वाची आणि काळजी वाढवणारी माहिती समोर आली आहे. नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमादरम्यान दिपके यांची प्रकृती अचानक खालावली. संवाद सुरू असतानाच त्यांना तीव्र मळमळ आणि उलटीचा त्रास होऊ लागल्याने, त्यांना हा कार्यक्रम अर्धवट सोडून घरी परतावे लागले. मिळालेल्या माहितीनुसार, जंतर-मंतर येथील तीव्र आंदोलनानंतर अभिजित दिपके यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. काही दिवसांत त्यांच्या तब्येतीत सुधारणा झाली होती. मात्र, आज पुन्हा एकदा त्यांची प्रकृती बिघडल्याचे पाहायला मिळाले. नागरिकांना न भेटताच त्यांना माघारी फिरावे लागल्याने उपस्थितांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले.

सध्या डॉक्टरांचे एक पथक त्यांच्या घरीच त्यांच्यावर उपचार करत असून, त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहे. वैद्यकीय तपासणीनंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती आहे. अभिजित दिपके यांनी नीट पेपरफुटीविरोधात पुकारलेल्या आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यामुळे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. नवी दिल्ली येथील जंतर-मंतरवरील आंदोलन संपताच अभिजित दिपके त्यांच्या स्वगृही छत्रपती संभाजीनगरमध्ये परतले आहेत. सध्या त्यांचा येथेच मुक्काम आहे. नागरिकांच्या भेटीगाठी आणि घरात आई-वडिलांना वेळ देण्यात ते सध्या व्यस्त आहेत. दिपके शिक्षणासाठी अमेरिकेत होते. मात्र, न्यायाधीश सूर्यकांत यांच्या वक्तव्यानंतर कॉकरोच पार्टीची अचानक केलेली स्थापना आणि नंतर नीट आंदोलनामुळे ते मायदेशी परतलेत.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एम. एस पठारे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ११९४/२०२६**

**ॲड. बी बी घुमरे**

**पंचफुला भ्र. कालिदास झोपे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. पंचफुला भ्र. कालिदास झोपे, वय-८० वर्षे, धंदा-घरकाम, रा. गोविंद नगर, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड २. रेखा भ्र. राजेश झोपे, वय ४४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. वरीलप्रमाणे ३. वैष्णवी पि. राजेश झोपे, वय-२१ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. वरीलप्रमाणे ४. आदित्य पि. राजेश झोपे, वय-१७ वर्षे, धंदा-शिक्षण, अ.पा.क आई रेखा भ्र. राजेश झोपे, वय-४४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. वरीलप्रमाणे

गैरअर्जदार :- निरंक (अर्जदार हे भारतीय आहेत)

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात राजेश पि. कालिदास झोपे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी राजेश पि. कालिदास झोपे यांचा मृत्यु दिनांक २४.०६.२०२६ रोजी राहत्या घरी, गोविंद नगर, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड येथे झालेला असुन अर्जदार क्र १ ही मयताची आई असून अर्जदार क्र २ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र ३ ही मुलगी असून अर्जदार क्र ४ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र ४ हा अज्ञान असल्याने अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्र २ ही आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत राजेश पि. कालिदास झोपे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९ सप्टेंबर २०२६

आदेशावरुन,
सही/-
**क. लिपीक**
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड



**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

**दुरध्वनीक्र. ०२४४७-२६२१४५**
e-mail.tahsildargeorai2@gmail.com
**क्रं.२०२६/दंड /कावि-२७**
**दिनांक २४.०७.२०२६**

**प्रती,**
**१. पोलीस निरीक्षक, गेवराई/तलवाडा/चकलांबा**
**२. ग्राम महसूल अधिकारी जातेगाव**
**विषयः मृत्यू नोंद आदेश मिळणे बाबत.**

संदर्भ:-१. शासन निर्णय क्रमांक जम्रनों २५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार गणेश महादेव चव्हाण रा. जातेगाव ता. गेवराई यांचा अर्ज दिनांक २४.०७.२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार गणेश महादेव चव्हाण रा. जातेगाव ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांची आई सुवर्णा महादेव चवहाण यांचा मृत्यू दिनांक २६.११.२०१८ रोजी जातेगाव येथे झाला असून संबंधीताची नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात मृत्यू नोंद आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो. स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म/मृत्यू ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीती दर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

तालका दंडाधिकारी गेवराई

स्वाक्षरित
**तालूका दंडाधिकारी गेवराई**


# शेतकऱ्यांना पीक विमा व सरसकट कर्जमाफी मिळेपर्यंत लढा सुरूच : राजेंद्र आमटे

## शेतकरी हक्क मोर्चाच्या शिष्टमंडळाची पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे मागणी

बीड। प्रतिनिधी

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर केलेला हेक्टरी १७ हजार रुपयांचा पीक विमा तातडीने वितरित करावा, सन २०२० पासूनची थकीत पीक विमा रक्कम अदा करावी तसेच कर्जमाफी योजनेतील त्रुटी दूर करून सरसकट कर्जमाफी लागू करावी, या प्रमुख मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे नेते राजेंद्र आमटे म्हणाले की, अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सरकारने हेक्टरी १७ हजार रुपयांचा पीक विमा देण्याची घोषणा केली होती. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला असला, तरी बीड जिल्ह्यातील अनेक पात्र शेतकरी आजही या लाभापासून वंचित आहेत. तसेच सन २०२० मधील थकीत पीक विम्याची रक्कम अद्यापही मिळालेली नसल्याने ती तातडीने वितरित करावी, अशी मागणी त्यांनी केली.ते पुढे म्हणाले की, कर्जमाफी योजनेच्या लाभार्थी यादीत अनेक त्रुटी असून अनेक पात्र शेतकऱ्यांची नावे वगळण्यात आली आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांऐवजी २ लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळालेला नाही. त्यामुळे या सर्व त्रुटी दूर करून सरसकट कर्जमाफीची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.''शेतकऱ्यांना हक्काचा हेक्टरी १७ हजार रुपयांचा पीक विमा, सन २०२० पासूनची थकीत विमा रक्कम आणि सरसकट कर्जमाफी मिळेपर्यंत शेतकरी हक्क मोर्चाचा लढा सुरूच राहील,'' असा इशारा राजेंद्र आमटे यांनी दिला.यावेळी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, बाळासाहेब मोरे पाटील (शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंच), राजू गायके (स्वाभिमानी शेतकरी संघटना), सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, माजी सैनिक अशोकराव येडे, भीमराव कुटे, मोहन जाधव (), सुहास जायभाय, गणेश गायकवाड, गणेश मस्के, खाजा भाई पठाण, अर्जुन सोनवणे, महादेव आमटे, वैभव सोळुंके आणि दीपक आमटे आदींच्या स्वाक्षरीचे निवेदन पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना सादर करण्यात आले.

# महापुरुषांचे विचार आत्मसात करा, त्यांना जातीत बांधू नका-धनंजय मुंडे

## जात किंवा आडनावाने नाही तर कर्तृत्वाने आपली ओळख व्हावी, असे काम करून दाखवा - ना. पंकजाताई मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी वंचित - उपेक्षितांना बळ दिले, आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांच्या वेदनांना फुंकर घातली, अशा जागतिक कीर्तीच्या थोर व्यक्तीचे स्मारक व सामाजिक सभागृह उभारण्यासाठी ५ गुंठे जागा नगर परिषदेस उपलब्ध करून देणार असून या आर्थिक वर्षात पहिल्या टप्प्यात या कामासाठी २५ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे धनंजय मुंडे यांनी परळीत आयोजित एका कार्यक्रमात बोलताना म्हटले आहे.

महापुरुषांना आपण जातीत वाटून घेतले आहे, मात्र परळीची संस्कृती वेगळी आहे. इथे शिवजयंतीचा अध्यक्ष आम्ही मुस्लिम समाजातील व्यक्तीला बनवतो. थोडक्यात महापुरुषांना आपण जातीत बांधून न घेता त्यांचे विचार आत्मसात करून सामाजिक प्रगतीकडे वाटचाल केली पाहिजे, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

परळी वैद्यनाथ शहरातील साठेनगर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ना. पंकजाताई मुंडे याही उपस्थित होत्या.

पंकजाताई मुंडे यांनी बोलताना, शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले तसेच तरुणाईला व्यसनमुक्तीचे आवाहन केले. अण्णाभाऊ साठे यांच्या चारित्र्याचा आणि त्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान आम्हा सर्वांना आहे. आज माणसाने स्वतःला वेगवेगळ्या रंगात वाटून घेतले आहे. पण जात, आडनाव यापेक्षा आपली ओळख ही आपल्या कर्तृत्वाने झाली पाहिजे, यासाठी परिश्रम घेण्याची तयारी ठेवा, असा मोलाचा संदेश पंकजाताई मुंडे यांनी दिला.

धनंजय मुंडे यांनी यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतींना आणि कार्याला उजाळा देत अनेक दाखले दिले. अत्यंत उत्साहात हा जयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, बाजीराव धर्माधिकारी, जुगलकिशोर लोहिया, अजय मुंडे, प्रा. विनोद जगतकर, वैजनाथराव सोळंके, भावड्या कराड, पवन मुंडे, अय्युब खान पठाण, शकील कुरेशी, ड. वैजनाथ वाघमारे, अंजलीताई माळी, मीराताई नागरगोजे, विक्रम मिसाळ, तानाजी व्हावळे, अश्विन मोगरकर, सुनील मस्के, रमेश मस्के, केशव नागरगोजे, हनुमंत गायकवाड यांसह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. तसेच परळी वैद्यनाथ शहरातील ज्येष्ठ पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

### परळीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



# लाचखोर लखमावारला चार दिवसांची पोलीस कोठडी!

**आपल्याच सहकार्याला मागितले ४५ लाख**

बीड । प्रतिनिधी

आपल्याच कार्यालयातील वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे तब्बल ४५ लाख रुपयांची लाच मागून ती स्वीकारणाऱ्या विभागीय वन अधिकारी श्रीनिवास लखमावार याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

बीड येथील सामाजिक वनीकरण विभागातील वन अधिकारी पदावर असलेल्या श्रीनिवास लखमावार या अधिकाऱ्याने आपल्याच कार्यालयातील वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे तब्बल ४५ लाख रुपये लाचेची मागणी केली होती. वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याचे निलंबन रद्द करणे तसेच २०२४ ते २०२६ या काळातील थकीत बिल मंजूर करणे यासाठी १२ टक्के प्रमाणे लखमावार याने ४५ लाख रुपये लाच मागितली आणि त्याच्या राहत्या घरी ही लाच घेताना त्याला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या छत्रपती संभाजी नगर येथील पथकाने शुक्रवारी अटक केली. लखमावार याला न्यायालयासमोर हजर केले असता ४ ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुराज्याच्या विचारातूनच 'महाराजस्व समाधान शिबिर'

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये महाराजस्व शिबिरासह महसूल दिन उत्साहात

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे केवळ राज्य नव्हते, तर ते सुराज्य होते. त्यांच्या प्रशासनात न्याय, पारदर्शकता, शिस्त आणि रयतेचे कल्याण यांना सर्वोच्च स्थान होते. आज राज्य शासनाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' हे त्याच लोककल्याणाच्या विचाराला पुढे नेणारे असून नागरिकांना शासनाच्या सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध करून देणारे आहे, असे प्रतिपादन शिबिराचे प्रमुख तथा भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

**एकाच ठिकाणी दिले अनेक योजनांचे लाभ**

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी विविध शासकीय विभागांनी उभारलेल्या स्टॉलची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. महसूल विभागासह विविध विभागांच्या योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. अनेक लाभार्थ्यांना एकाच ठिकाणी जागेवरच विविध दाखले, प्रमाणपत्रे व शासकीय योजनांचा लाभ वितरित करण्यात आला.



मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून बीड शहरातील अंबिका लॉन्स येथे शनिवारी (दि.१) छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरासह महसूल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विशेष अतिथी म्हणून शिबिराचे प्रमुख डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार ◀◀ पान ३ वर

# ग्रामीण रुग्णालय धारूरला १०० खाटांच्या रुग्णालयाची मंजुरी द्या; उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे सादिक इनामदार यांची मागणी

धारूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर येथील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा उंचावून ते १०० खाटांच्या रुग्णालयात रूपांतरित करावे तसेच रुग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय साहित्य व उपकरणे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समिती, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री नामदार सुनेत्रा ताई पवार यांच्याकडे केली.



यावेळी सादिक इनामदार यांनी धारूर तालुक्यातील वाढती लोकसंख्या, रुग्णांची वाढती संख्या आणि ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांची गरज लक्षात घेता १०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच आधुनिक वैद्यकीय उपकरणे, औषधसाठा आणि इतर आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली.या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांनी रुग्णालयाला १०० खाटांची मंजुरी व आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक निर्णय घेऊ असा शब्द दिल्याचे सादिक इनामदार यांनी सांगितले. यावेळी सादिक इनामदार यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांचे आभार मानत, धारूर तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. या मागणीमुळे धारूर तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्काराने लक्ष्मण वाघमारे सरांचा गौरव

वडवणी । प्रतिनिधी

आपुलकी व आस्था सेवाभावी संस्था, सेलू (जि. परभणी) यांच्या वतीने सन २०२५-२६ चा मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक.शाळा, ढोरवाडी ता. वडवणी, जि. बीड येथील कर्तव्यदक्ष शिक्षक श्री.लक्ष्मण वाघमारे यांना प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन मा. गोविंदराव नांदेड साहेब(मा.शिक्षण संचालक,पुणे), श्री.संजय ससाने (शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद परभणी), श्री.शैलेश लाहोटी (उपजिल्हाधिकारी, परभणी), श्री.मिलिंद सावंत (नगराध्यक्ष, सेलू) संयोजक शिवशंकर मोरे सर यांच्या यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



. वडवणी तालुक्यातील ढोरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक श्री लक्ष्मण वाघमारे हे गेल्या वीस वर्षापासून शिक्षण क्षेत्रातील समर्पित सेवा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य तसेच लोकसहभाग आणि समाजाभिमुख उपक्रम, विद्यार्थी गुणवत्ता यांची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना देण्यात आला. या यशाबद्दल वडवणी तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटना तसेच नागरिकांकडून श्री. लक्ष्मण वाघमारे यांच्यावर अभिनंदनचा आणि ◀◀ पान ३ वर

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती व लो.टिळक स्मृतिदिन साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन के मुळे होते.यावेळी उपप्राचार्य डॉ एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते आणि प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. एन. के. मुळे म्हणाले की,अण्णाभाऊ साठे यांनी साहित्यातून बहुजन नायक निर्माण केल्याचे सांगून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाचा तसेच लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षण, राष्ट्रप्रेम, सामाजिक समता आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचा ◀◀ पान ३ वर



# मोठेवाडी ग्रामपंचायत कार्यालयात आण्णाभाऊ साठे जयंती साजरी

माजलगाव :- तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमतः साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामसेवक बिभीषण डोरले हे होते तर उपसरपंच अंगद खेत्री, ग्राम पंचायत सदस्य जगन्नाथ खेत्री, विलास खेत्री व गावातील गजानन गोंडे, बबन दळवी,दत्तात्रय दळवी, त्र्यंबक वैराळ,संजय रोकडे, प्रवीण खेत्री,आबाराव कांबळे, सोमेश्वर हिवरकर,महादेव वीर,परमेश्वर खेत्री, गणेश सर्जे,प्रकाश शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

# क्रांतिसिंह नाना पाटील,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व शेकापच्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यास उपस्थित रहा-गोले

माजलगाव । प्रतिनिधी

क्रांतिसिंह नाना पाटील व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिन सोहळा सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी सकाळी ११.३० वाजता केज येथील मुक्ताई फंक्शन हॉल, धारूर रोड येथे संपन्न होत असून त्यामध्ये समाजातील विविध स्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना भव्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर हे राहणार



असून कार्यक्रमाचे उद्घाटन मा. आ. बाळाराम पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास विशेष उपस्थिती आलीबाग नगर पालिकेच्या अॅड. मानसी ताई म्हात्रे,मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.मिलींद नाना आव्हाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समाजहित, शेतकरी, कामगार, शिक्षण, सामाजिक कार्य आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा क्रांतिसिंह पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्याचा तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक व साहित्यिक योगदानाचा ◀◀ पान ३ वर

# कार्यकर्ता प्रामाणिक असेल तर नेत्याची खंबीर साथ मिळते - अॅड. सुभाष राऊत

बीड । प्रतिनिधी

कार्यकर्ता प्रामाणिक असेल तर नेत्याची खंबीर साथ मिळते हे मी अनुभवातून शिकलो आहे. सामाजिक चळवळीच्या माध्यमातून उभा राहिलेली अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद ही प्रामाणिक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी वाढवलेली संघटना असून बहुजनांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ना. छगनरावजी भुजबळ साहेबांनी शाहू - फुले - आंबेडकर - छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू केलेली सामाजिक चळवळ आहे. प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांनी प्रत्येक वेळी खंबीर साथ दिलेली आहे असे प्रतिपादन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत यांनी केले.



बीड जिल्हा समता परिषदेची जिल्हास्तरीय बैठक ड. सुभाष राऊत यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. ०१ ऑगस्ट २०२६ रोजी शासकीय विश्रामगृह, बीड येथे पार पडली. या बैठकीस श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक तथा दै. मराठवाडा साथीचे बीड जिल्हा प्रतिनिधी ड. संदीपजी बेदरे, समता परिषदेचे जिल्हाउपाध्यक्ष नितीन साखरे, जगन खेत्री, ओबीसी नेते किशोर चौधरी, बापू गाडेकर, सचिन राऊत, दीपक भुजबळ, कृष्णा शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या सुरुवातीस साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे यांनी केले. यावेळी ते म्हणाले की, बीड जिल्हा समता परिषदेची धुरा आता युवकांच्या हाती सोपवण्यात आली आहे. या पुढील काळात बहुजन समाजातील युवक समता परिषदेची जोडून समता परिषदेचे विस्तारित कार्य केले जाईल. यावेळी मार्गदर्शन करताना ड. संदीप बेदरे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यामध्ये समता परिषदेचे कार्य मोठ्या जोमाने सुरू आहे. ओबीसी समाजावर आलेल्या संकटांना आणि समाजाच्या विविध समस्यांवर आंदोलने, धरणे, रस्ता रोको मोर्चे काढून ड. सुभाषराव राऊत यांनी ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली

# अण्णाभाऊ साठे जयंतीला महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पाटोदा । प्रतिनिधी

महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय, नायगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त अण्णाभाऊ साठे लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांची भाषणे, गीतगायन आणि विचारमंथनाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक श्री. सातपुते सर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनाचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा तसेच मेहनत, शिक्षण आणि समाजसेवेच्या बळावर जीवनात यश संपादन करावे, असे मार्गदर्शन केले.



शाळेतील शिक्षक श्री. सय्यद सज्जाद सर यांनी आपल्या मनोगतात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य, शाहिरी आणि लोककलेच्या माध्यमातून समाजातील वंचित, कष्टकरी व शोषित घटकांचा आवाज बुलंद केला. असल्याचे सांगितले. त्यांच्या विचारांतून समता, मानवता आणि सामाजिक न्यायाचा संदेश मिळतो. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करावे, असे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26